म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. क्र. ९०८

REFBK-0005339

ক্রমিক ১০৫

RFFBK-0005339



चित्रशाळा प्रेस, पुणे.

शिवाजी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
स्थल सं. 7
५३३८
५२७९

# शिवाजीची बखर

## प्रस्तावना

जनसेवा मासिकाच्या जानेवारी १९३४ चे अंकांतील उद्देशांत सूचित केल्याप्रमाणें ही बखर आम्ही आतां वाचकांस पूर्णपणें सादर करीत आहोंत. मूळ बखर मोडी लिपींत जुनरी सुडाच्या कागदावर लिहिलेली आहे. त्यामुळें कांही ठिकाणीं वाचनांत किंवा अक्षरओळख पडण्यांत चूक होणें शक्य आहे. परंतु अशी ठिकाणें फार थोडी आहेत. त्यामुळें मूळ बखरीचें वृत्त या छापील प्रतींत जसेच्या तसे वाचावयाला मिळतें. बखरीच्या कागदाची रुंदी साडे पांच ( ५½ ) इंच आहे, व घडी घातलेल्या पानांची लांबी नऊ ( ९ ) इंच आहे. या हिशेबानें हस्तलिखित एके बाजूस लिहिलेली अशी २०२ पानें होतात. हीं पानें सुटीं नसून एकास एक चिकटविलेलीं आहेत म्हणून सर्व बखर उघडली असतां रुंदी साडे पांच इंच कायम राहून लांबी सळंग दीडशे ( १५० ) फूट भरेल.

या बखरीचे मजकुराविषयीं विचार करितां हिचें स्थूलमानानें तीन भाग पडतात.

पहिला भाग--यांत युधिष्ठिरापासून महाराष्ट्र राजे व महंमदशाहा मुसलमान पातशाहाची वंशावळीं पानें १ ते १२ पर्यंत दिली आहे.

दुसरा भाग—शिवाजीची ९२ कलमी संकलित हकीकत असलेला भाग पानें १३ ते ५४.

तिसरा भाग—परिशिष्टाच्या स्वरूपाचा असोन त्यात सेनापति, मुजुमदार यांची यादी, देवीचें भविष्य, शिवशकावली, व दुसरी इंग्रजांनी पुण्यावर झेंडा रोवींपर्यंत मजकूर असलेली सरासरी दोनशें वर्षांची शकावली इतका मजकूर आला आहे. पानें ५४ ते ६०

आतां या तीनही भागासंबंधानें स्वतंत्रपणें विचार करूं.

१ पहिल्या भागांत पान ७ वर दर्शविल्याप्रमाणें युधिष्ठिर, वीरसेन, नरहरी, मंत्री, नृपसिंग, विक्रमजित्, जैसिंग, माधवसेन धीरंधर, पृथ्वीपाल, अशा दहा महाराष्ट्र वंशातील राजांची नांवनिशीं वर्षे, मास, दिवस सुद्धा दिली आहे. यात एकदर १२० पुरुष येतात. व त्या सर्वांनीं मिळून ३९२७ वर्षे राज्य केलें. त्यानंतर मुसलमान पातशाही झाली. ती पातशाही महमदशापर्यंत ९१५ वर्षपावेतों अस्तित्वात होती. याप्रमाणें एकंदर ४८३९ ( ४८४२ ? ) वर्षांचीं राजे व पादशहांची नामावली येत आहे. ( पान १२ ). यांत तीन वर्षांची चूक येते. परतु सर्व आकडे बखरीप्रमाणेंच दिले असल्यानें ही चूक प्रतींत किंवा नकलेंत असली पाहिजें. परतु ५००० वर्षांत ३ वर्षे ही क्षुल्लक बाब आहे.

या वंशावळी संबंधीं विचार करितां असें दिसून येतें कीं, निराजी राहूजी हुजीब ( पा. १२, १३ ) यास दिल्लीची वंशावळी पाठविण्याविषयी रायगडीहून आज्ञा झाली होती. त्यावरून अनाजी रंगनाथ मलेकर व येसाजी मल्हार वाईकर यांनी पारसीची नकल हिंदवी करून रायगडास पाठविली. व पुढें अनाजीचा पुत्र 'खंडो' यांनीं अनाजीजवळ असलेल्या तर्जुम्यावरून प्रस्तुत वंशावळी लिहिली आहे. निराजी हा शिवाजीबरोबर दिल्लीचे कैदेत होता, व त्यानें बैराग्याचे वेषांत महंत बनून शिवाजीस कैदेतून निसटून जाण्यास मदत केली होती ( क. ५४ )

या ५००० वर्षांच्या नामावळीकडे पाहिलें असतां त्यात शक, संवत् वगैरेचा फारसा उल्लेख केलेला नाहीं. परतु वर्षं, महिने, दिवस फार कसोशीनें दिलेले दिसतात. आता दिलेली माहिती कितपत ग्राह्य समजावी हा सध्यां अस्तित्वांत असलेल्या ऐतिहासिक साहित्याबरोबर तौलनिक दृष्टीनें अभ्यास करणाऱ्या इतिहास संशोधकाचा प्रश्न आहे. बखरींतील माहिती छापील पुस्तकरूपानें आम्ही जनतेपुढें ठेवीत आहों. परतु हल्लींच्या इतिहासग्रंथांत जी विश्वसनीय मानलेली सनावली दिली असते तिच्या अनुरोधानें खाली दिलेल्या कोष्टकाप्रमाणें स्थूलमानानें निरनिराळ्या राजवंशाचे सन बसविता येतात

| वंशाचें नाव | इसवी सन | सुमारें | वर्षें |
|---|---|---|---|
| युधिष्ठिर | ३१०२ B. C ते १२४५ B. C. | | १८५७ |
| वीरसेन | १२४५ B. C. ते ८२७ B. C. | | ४१८ |
| नरहरी | ८२७ B. C. ते ३४८ B. C. | | ४७९ |
| मंत्री | ३४८ B. C. ते ३८ B. C. | | ३१० |
| नृपसिंग | ३८ B. C. ते २ A. D. | | ४० |
| विक्रमजित् | २ A D ते १५१ A. D. | | १४९ |
| जैसिंग | १५१ A. D. ते २९८ A. D. | | १४७ |
| माधवसेन | २९८ A. D. ते ४०६ A. D. | | १०८ |
| धीरंधर | ४०६ A. D. ते ७३८ A. D. | | ३३२ |
| पृथ्वीपाल | ७३८ A. C. ते ८२४ A. D. | | ८६ |
| एकंदर | ३१०२ B. C. ते ८२४ A. D. | | ३९२६ |
| मुसलमान पातशहा | ८२४ A. D. ते १७३८ A D. | | ९१४ |
| | | एकूण. | ४८४० |

याप्रमाणें हिशेब धरिल्यास कलियुगाचा प्रारंभ इसवी सनापूर्वी ३१०२ वर्षे येतो. व तें अनुमान कित्येक इतिहासज्ञानीं केलेल्या अनुमानाशीं जुळतें येतें. तसेंच ठोकळ मानानें महाराष्ट्रांतील युधिष्ठिर वंशाने साधारणतः १९०० वर्षे राज्य केलें,बाकीच्या ९ महाराष्ट्र वंशांनीं तितकींच वर्षे, व मुसलमानानीं १००० वर्षे याप्रमाणें जवळ जवळ ४८०० वर्षांचा हिशेब बसतो.

आता या बखरीचा दुसरा भाग म्हणजे ज्यांत मालोजीपासून शिवाजीचे मृत्यु-पर्यंत ९२ कलमात निवेदन केलेला वृत्तांत येतो त्याविषयीं थोडासा विचार करूं. या बखरींत निवेदन केलेली हकीकत व इतिहास म्हणून प्रसिद्ध असलेला भाग यांत कितपत तफावत आहे तें इतिहासनिरीक्षकाचें काम आहे. त्याविषयीं या लहानशा उपोद्घातात विचार करणें शक्य नाहीं. तथापि कांहीं ठळक गोष्टीसंबंधीं थोडेसें दिग्दर्शन याखालीं करीत आहों.

*शिवाजीचा राज्यसंस्थापनेचा काल अत्यंत* धामधूमीचा होता. अशा वेळीं राज्य कमाविणें व तें राखणें म्हणजे त्याकरितां असामान्य, लोकोत्तर बुद्धिमत्तेची जरूरी होती हें निर्विवाद होय. व तसली बुद्धी शिवाजी महाराजाचें ठायीं होती यांत त्याची कर्तबगारी *पाहिली असतां मुळींच शंका* रहात नाहीं व त्यांनीं आपल्या हयातींत राज्य कमाविणें, व तें राखणें ह्या दोन्ही गोष्टी केल्या होत्या. परंतु कमा-विण्यापेक्षा मिळविलेलें राज्य टिकविण्याकरितां नेहमीं जास्त कर्तबगारीची व मुत्सद्दे-गिरीची जरूरी असते. शिवाजीनंतर राज्य टिकविण्यास लागणाऱ्या या विशिष्ट गुणांस ओहोटी लागल्यामुळें मराठ्यांचें राज्य पुष्कळ अंशीं कमकुवत झालें.)

श्रीमंताच्या मुलांना वाईट मार्गावर नेण्याकरितां त्यांचे भोंवतीं नेहमीं आपमत-लबी, हांजी हांजी करणारी मंडळी गोळा होत असते. व मुलास दुर्वर्तनाकडे प्रवृत्त करण्यांत यांचा फायदा असतो. मग यामुळें तें श्रीमंताचें घराणें पार बुडालें तरी यांना त्याची क्षिती नसते. दुसरें, वडिलांची संपत्ति आयती प्राप्त झाली असली म्हणजे ती मिळविण्यास काय श्रम, कष्ट पडले असतील त्याचें मुलांस काय होय ? तितक्यांतून त्यावर पूर्ण देखरेख करण्याकरितां कळकळीचीं माणसें नसलीं म्हणजे वरील स्वार्थसाधू मंडळीचें चांगलेंच फावतें. या साध्या गोष्टीचें प्रत्यंतर संभाजीचे संबधांत दिसून येतें. शिवाजी महाराज ही गोष्ट जाणून होते. परंतु कार्यबाहुल्या-मुळें किंवा पुरेशा वेळेच्या अभावीं त्यांना या संबधांत विशेष कांहीं करतां आलें नाहीं. व शेवटीं शिवाजीचे निधनानंतर मराठी राज्यास उतरती कळा लागण्याचें हें एक जबरदस्त कारण घडलें.

आणखी एक गोष्ट म्हणजे फंदफितुरीची. आपल्या राज्यांत किंवा गोतावळ्यांत शत्रु कोण व मित्र कोण हें समजणें केव्हां केव्हां महामुष्कीलीचें होऊन बसतें. बाह्यात्कारीं जो 'आपला' म्हणून समजावा तो 'आंतून' शत्रूकडे लागलेला असतो, अशीं उदाहरणें या बखरींत वाचावयास मिळतात. याचें कारण पाश्चात्य देशांत ज्याला स्वदेशाभिमान म्हणून हल्लीं म्हणतात तो गुण त्यावेळेस पूर्णावस्थेला पोहोंचला नव्हता या गुणाचा नुकतांच कोठें उदय झाला होता व या गुणाचें जाज्वल्य स्वरूप म्हणजे स्वतः शिवाजी महाराजच होत

या फंदफितुरीची काळी छाया महाराष्ट्राच्या किंबहुना हिंदुस्थानदेशाच्या इतिहासांवर पडलेली ठायीं ठायीं दिसून येते. व अद्यापही या अवगुणाचा जितका नायनाट व्हावयास पाहिजे तितका न झाल्यानें एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेस जोम येत नाहीं. आतां याची कारणमीमांसा करूं गेले असतां तो एक वेगळा स्वतन्त्र विषयच होऊं पाहील, म्हणून ह्या छोट्याशा प्रस्तावनेंत दिग्दर्शन करण्यापलीकडे जास्त विवेचन करणें शक्य नाहीं.

या बखरीच्या वाचनानें आणखी एक गोष्ट डोळ्यासमोर उभी राहते ती ही कीं त्या वेळीं नीतीमत्ता, दगाबाजी, क्रौर्य वगैरेंची जीं उदाहरणें मधून मधून दृष्टीस पडतात त्याकडे आधुनिक कालच्या चष्म्यानें पाहणें योग्य होणार नाहीं. कारण राजनीती ही भर्तृहरीच्या 'वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा' या वचनाप्रमाणें स्थल, काल, परिस्थिती यांच्या अनुरोधानें लवचिक व बदलणारी असते.

वैयुक्तिक नीती व राजकीय नीती यामध्यें महदंतर असते. शांततेच्या काळीं जी शिक्षा देणें गर्ह्य समजलें जातें तसली शिक्षा धामधूमीचे कालांत राजकीय नीतीच्या पायीं पुष्कळशा निरपराधी लोकांसही देण्याची वेळ येते. व तसली उदाहरणें या बखरींत कांहीं ठिकाणीं दिसून येतात. याचें कारण शांततेच्या वेळचे कायदे, नीतीच्या कल्पना धामधूमीचे काळीं (state of war) अपुरे पडतात. व त्यावेळीं कडक उपाय योजना (martial law) करावी लागते. त्यामुळें एकदर राज्याच्या सुरक्षिततेकरितां इतिहासांतरी केलेल्या विश्वासघात, दगाबाजी, फसवणूक वगैरे कृत्याकडे केव्हां केव्हां निराळ्या दृष्टीनेंच पाहणें जरूरीचे असते.

शिक्षा देण्याचेही अनेक प्रकार दिसून येतात. हातपाय तोडणें, डोळे फोडणें, चौरंग करून किंवा गारींत घालून मारणें, हत्तीचे पायीं देणें, रथास जोडून फरफटणें, सुळावर चढविणें, फाशी देणें, विजेचा धक्का देऊन यमसदनीं पाठविणें हे व असले शिक्षा देण्याचे प्रकार कालमानाप्रमाणें निरनिराळें असणें शक्य आहे. सुधारणायुग जसजसे पुढें पुढें सरकत आहे तसतसे या प्रकारांतही सुधारणा होत चालली आहे. म्हणून केवळ याबद्दल जुन्या लोकांस दोष देण्याचें विशेष कारण नाहीं.

या सर्व बाबीकडे आतां हंसक्षीर न्यायानें पाहिले पाहिजे. सध्याचे काळीं अनुकरणीय अशा चांगल्या गोष्टी घेऊन बाकीच्यास घडून गेलेल्या गोष्टीपेक्षां, निव्वळ इतिहासापेक्षां जास्त महत्व देण्याची जरुरी नाहीं. शत्रु आणि मित्र, हाडवैरी व कट्टे दुष्मन्, वगैरे विरुद्ध पक्षोपपक्षातील लोक आतां कालवश झाले आहेत. म्हणून त्यावेळची हल्लीं नामशेष झालेली भांडणें पुनः उकरून काढून, त्याचा काथ्याकूट करून डोकीं गरम करून घेण्यात साधारण लोकांना तरी कांहीं फायदा नाहीं. बाकी शांत डोक्याच्या इतिहाससंशोधकांना हा न्याय लागूं करितां येणार नाही हें उघड आहे.

बखरींचा तिसरा भाग जो परिशिष्टरूपाचा आहे म्हणोन वर लिहिलें आहे, त्यातील शकावल्या हल्लीच्या सनावल्याशी ताडून पाहिल्या पाहिजेत. व जरूर तो फरक करून घेतला पाहिजे. हा भाग इग्रजानीं पुण्यावर झेंडा रोवींपर्यंतचा असल्यानें फार अर्वाचीन आहे, व त्यावरून या बखरींतील मजकूर निरनिराळ्या वेळीं लिहिला गेला असला पाहिजे हे उघड होते. ह्या भागाचा संशोधकांस तौलनिक पद्धतीनें उपयोग होण्यासारखा आहे.

आतां या बखरीच्या वाचनापासून सद्यःस्थितींत काय बोध घ्यावा याविषयीं दोन शब्द लिहून आम्ही ही प्रस्तावना पुरी करितो. शिवाजी महाराजानीं ज्या परिस्थितींत राज्य स्थापना केली ती आतां उरली नाहीं. परंतु देशाभिमान, राष्ट्राभिमान, समयसूचकता, शौर्य, नीती वगैरे जे गुण शिवचरित्रात दिसून येतात ते आपणांत आणावयाचा प्रयत्न केल्यास त्याचा पुष्कळ उपयोग होणार आहे. समाजांत सध्यां मधून मधून डोकाळूं पाहात असलेली, नाटकी, उच्छृंखल, बालिश, उथळ, बेशिस्त, वृत्ती सोडून देऊन राहणींत, आचारांत, विचारांत, भारदस्तपणा, बहुश्रुतपणा, एक वेळीं राज्य कमाविलेल्या शूराच्या वंशजास शोभेल अशी कडकडीत शिस्त, धैर्य, लोकसंग्रह वगैरेनीं युक्त अशी नवी जोमदार वृत्ती कशी उत्पन्न होईल याकडे लक्ष्य दिलें पाहिजे. नुसते नांवाचे, नामधारी, शिवाजीचे शूर मरहट्याचे वंशज म्हणवून घेण्यांत, आणि आमच्या पूर्वजानीं राज्यें कमाविली होती, हें सांगण्यांत काय पुरुषार्थ आहे? राज्यें कमाविली पण गमाविली हें दूषण कांहीं कमी नाहीं

त्यापेक्षा ज्यांच्या पाठीमागें सोज्वल इतिहास नाहीं ते तरी फार बरें. नवी विटी नवें राज्य.

शिवाजीचे शूर मरहट्ट्यावर, विशेषत महाराष्ट्रीयावर एक वेळचे राज्यकर्ते म्हणून एक विशिष्ठ जबाबदारी येऊन पडते. ती चुकवितां येणार नाहीं. जातिबंधनें तोडावीं कीं जोडावीं; अभक्ष्यभक्षण, मासाहार करावा कीं त्याजावा, कुलीन स्त्रियानीं रंगभूमिवर येऊन नाचावें किंवा पुरुषानींच विडंबनयुक्त बाष्कळ नाटकें लिहून किंवा अंगविक्षेप करून स्वतःस नटवर्य, नटसम्राट, गायन विशारद इत्यादि पदव्या लावून घ्याव्या, इत्यादि शुष्क वादविवाद वाढवून कालक्षेप करण्यात काय अर्थ आहे? असल्या फंदांत पडून, हलका पेशा पत्करून किंवा मादक पदार्थांचे व्यसनात गुरफटून इतराकडून 'हे पाहा अधोगतीस लागलेले शूर शिवाजीचे किंवा महाराष्ट्रीयाचे वंशज' म्हणून बोट दाखवून घेणें व मानखंडना, मानहानि, अवहेलना, अपमान मान खालीं घालून सहन करणें, यापेक्षां 'दुर्गति,' 'दैवदुर्विलसित' कोणतें असूं शकणार?

त्यापेक्षां हल्लींच्या कालमानाला अनुरूप अशीं निरनिराळ्या विषयांतील संशोधन कार्यें, औद्योगिक चळवळी, नौकागमन, विमानविद्या, परदेशगमन, व्यापार, निरनिराळ्या शास्त्रातील प्रावीण्य संपादन याकडे जास्त लक्ष्य पुरविल्यास 'शिवाजीचे वंशज' 'अस्सल मरहट्टा' वगैरे नामाभिधानें सार्थ होणार नाहींत काय?

संपादक

# अनुक्रमणिका

अनुक्रमणिका ......... १—७
युधिष्ठिरापासून महंमदशाहापर्यंत वंशावळ ......... १-१२
९२ कलमी बखर ......... १३-५४

१ मालोजी व विठोजी भोसले सिंदखेडास लुखजी जाधवरावाकडे चाकरीस राहतात. २ शाहाजी राजाचा जन्म. ३ शिमगासण. शाहाजी व जिजावा गुलाल खेळतात. जाधवराव ' जोडा इजोगा ' म्हणून सहज उद्गारतात. ४ मालोजी व विठोजी यांचा जाधवरावाबरोबर बेबनाव. ५ मालोजी परत येरुळास—भवानीचा वर. ६ जाधवरावाचा सिंदखेडकराबरोबर ' सोगाइ 'चा दावा. ७ मशींदींत मेलेले डुक्कर. पातशाहाची जाधवरावावर इतराजी. ८ शाहाजीबरोबर जिजावाचा वाङ्निश्चय. ९ शाहाजी जिजावाचें लग्न. १० मालोजीचा दानधर्म—घृष्णेश्वर देवालय......... १३-१८

११ निजामशाहाचा अंत. शाहाजी राजे दिवाण. १२ जाधवराव ' हरोल ' होऊन दौलताबादेवर दिल्लीच्या बादशाहाकडून स्वारी. १३ माहुलीस वेढा. १४ शाहाजी विजापुरास ' पलोन ' गेले. १५ शाहाजीचा पाठलाग. शिवाजीचा शिवनेरीस जन्म. १६ शाहाजीस कर्णाटकची जहागीर. दिल्लीची फौज परतली. १७ मलिकंबराची दौलताबादेस वजीरी १८ मलिकंबराची धामधूम व शाहाजी वगैरेकडून पराभव. १९ नागर गावचे ' तुळा 'पूर कसें झालें २० मोरो तानदेव यांची मुमेगिरी. शाहाजीच्या जहागिरी. ......... १९-२४

२१ शाहाजीचें लग्न. मुरार जगदेव यांचा ' चौरंग ' करून शिरच्छेद. २२ शाहाजीनें चंदावर घेतलें. २३ मलिकंबर व साबाजी अनंत यांचा मृत्यु. औरंगजेब दक्षिणेस सुभा स्थापन करितो. २४ दादो कोंडदेव याचा मृत्यु. शिवाजीनें सर्व मुलखांची व्यवस्था आपले ताब्यांत

घेतली. २५ शिवाजी व औरंगजेब यांचा दावा लागला. २६ औरंगशहा दिल्लीचा पातशा झाला. २७ शिवाजीचा पुरंदरचे निळोजी निळकंठराव यांचबरोबर दावा. २८ पुरंदर किल्ला शिवाजीचे स्वाधीन. २९ शिवाजी चाकण, राजगड, तोरणा वगैरे किल्ले ताब्यात घेतो. शिवाजीचा जावळीच्या 'मोरे 'बरोबर 'दावा' व 'फत्ते'. ३० जावळी राज्य खालसा... २४–२९

३१ विजापूरकर व शिवाजी यांचा दावा लागला. आबदुल्लाखानाची शिवाजीवर मोहीम. ३२ दोघांची प्रतापगडाखालीं भेटीची तयारी. ३३ आबदुल्लाखान सदरे सलिंध येतो. ३४ आबदुल्लाखान पोटी बिचवा मारून ठार. ३५ खानाची फौज चाहेस 'बुडविली'. ३६ सातारा, चंदन वंदन इ. गड घेतले. ३७ आबदुल्लाखानाचा पुत्र फाजिलखानाचा पनालियास वेढा. ३८ शिवाजी वेढ्यांतून निसटून गेला. ३९ बाजी प्रभूची स्वामिभक्ती व मृत्यु. ४० पिंगळे यास पेशवाई. ......... २९–३४

४१ मोहोकोमसिंगाची शिवाजीवर मोहीम. पराभव व मृत्यु. ४२ शिवाजीचें लग्न राज्याची बंदोबस्ती. ४३ शास्ताखानाची शिवाजीवर रवानगी. काऊजी बंदा मारिला. ४४ शास्ताखानाचें शिवाजीस पत्र. ४५ त्यावर शिवाजीचे प्रत्युत्तर. ४६ शास्ताखानाचा 'अंगठा' उडाला. त्याचा पुत्र मारिला. ४७ शास्ताखान पुण्यास परतला ४८ मिर्जा राजा सुभा झाला. ४९ मिर्जा राजाचा कोंढाणा सिंहगडास वेढा ५० मिर्जा राजाची शिवाजीबरोबर भेट, दिल्लीस जाण्याचा मनसुबा. ......... ३४–३८

५१ रामसिंगाबरोबर लवाजमा घेऊन शिवाजीचें दिल्लीस प्रयाण. ५२ शिवाजीस लष्करासुद्धां कैद. ५३ लष्करास परत जाऊं दिले. ५४ शिवाजी कैदेंतून निसटला ५५ शिवाजी बैरागी वेषात यात्रा करून रायगडास परत. ५६ संभाजी रायगडास परतला.५७ डबीर व कोरडे यांची कैदेतून सुटका. ५८ मिर्जा राजावर दिल्लीची इतराजी. दलेलखान दक्षिणचा सुभेदार. ५९ संभाजीचे दलेलखानाबरोबर गुप्त खलबत. संभाजीस कैद. ६० संभाजीची सुटका. ......... ३८–४१

६१ दुलेलखानास विषाचा प्याला. ६२ शिवाजीचा दिल्लीबरोबर तह. ६३ सुरत लुटली. ६४ राजारामाचा जन्म. ६५ हुसनूर पेठ लुटली. सिवाप्पा नाइकाशी तह. ६६ शाहाजीस विजापूरकराकडून कैद. ६७ रणदुल्लाखानाची रदबदली. ६८ शाहाजीची सुटका. ६९ शिवाजीकडून बाजी घोरपड्याचें पारिपत्य. ७० शाहाजी व शिवाजीची भेट....... ४२–४६

७१ प्रतापराव गुजराचा मृत्यु. ७२ शाहाजीचा घोड्यावरून पडून मृत्यु. ७३ विजापूरकराबरोबर तह. ७ लक्ष होन नालबंदी. ७४ भागानगरच्या तानशाहाबरोबर तह ७५ रघुनाथराव हणमते यांचा येकाजीशी बेबनाव. ७६ चंदावरचे राज्य घेण्याची शिवाजीबरोबर मसलत. ७७ शिवाजी कनकगिरीकडे कूच करितो. ७८ भागानगरच्या तानशाकडून लष्करचा खर्च घेतला. ७९ भागानगरीस एक महिना मुक्काम. ८० कर्नोलकराजवळून ५ लक्ष होन घेतले. श्रीशैल्याची यात्रा केली....... ४७–५०

८१ वेरुळास वेढा. चंदी घेतली. ८२ चंदावरचें राज्यांत वाट्याबद्दल मागणी ८३ चंदावरच्या फौजेशी युद्ध. ५० लक्ष होनाचा मुलूख घेतला. ८४ विजापूरकराशी युद्ध. हुसेनखान मायणा व लाधीखान यांचा पाडाव ८५ कापले व बहादुर बिंडा किल्ला घेतला. ८६ बहिरराव मोहिते व मलेकर यांना बक्षिसें दिलीं. ८७ शिवाजीचे मौजीबंधन व राज्याभिषेक ८८ रणमस्तखानाबरोबर लढाई. ८९ शिवाजीचा मृत्यु. ९० संभाजी पनाळियास. ९१ नव्वद प्रकरणांत संकलित कथा वर्णिली. ९२ हस्ताक्षर खंडो अनाजी मलेकराचे. ......... ५०–५४

परिशिष्टें:—भवानी वाक्यकथन. सेनापति व मुजूमदाराची यादी. शिवशकावली. शिवजन्मापासून इंग्रजांनीं पुण्यावर झेंडा रोवीपर्यंतची दुसरी शकावली. ......... ५४–६०

९२ कलमी बखरींतील नांवांची सूचि ......... ६१–६४

नद्या, ओढे, किल्ले, गड, घाट, देश, प्रांत, गावें वगैरेची सूचि......... ६५–६६

७२५८
८०१

# शिवाजीची बखर

अश्विन वद्य १० विश्वावसू नाम संवत्सरे ते दिवशीं संताजी मोहिते व संतगडावरले तलबीड आहे. याणी सांगितले तेच लिहीले आहे ते तुळजा-महाराजयाजपासून काहीं माहितगीरीस आले त्याजला माहित होते म्हणोन लिहून घेतले मुकाम महेश्वरी लिहीले असे

जाबता राजेहाय व पादशहा तक्त दिल्ली ई॥ आरंभ कलियुगापासून राजा युधिष्टिर व वरकड राजे पातशहा जाले त्यांचा तपशील

महाराष्ट्र राजे १२० या मुदती जमा बाकी वर्षें ३९२६ मास १०दिवस१

राजा युधिष्टिर याचे घराण्याचे पुरुष

| | पुरुष | वर्षें | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा युधिष्टिर | १ | ३६ | ८ | २५ |
| ,, परिक्षिति | २ | ६० | १ | ० |
| ,, जन्मेजय | ३ | ८४ | ५ | २७ |
| ,, अश्वमेध शतानिक | ४ | ८२ | ८ | २४ |
| ,, धर्म | ५ | ८८ | २ | ८ |
| ,, मनंजीत | ६ | ८१ | ११ | २४ |
| ,, जरारथ | ७ | ७५ | ८ | ४ |
| ,, दीनपाल | ८ | ७५ | १० | १८ |
| ,, उग्रसेन | ९ | ७७ | ७ | २४ |
| ,, सूरसेन | १० | ७९ | ८ | २९ |

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा भूपती | ११ | ६१ | ७ | २ |
| ,, रणजीत | १२ | ६५ | १० | २९ |
| ,, वीरजित | १३ | ६४ | ७ | ३ |
| ,, भीमसेन | १४ | '५५ | ८ | २९ |
| ,, सुकमल दंडी | १५ | ६२ | ० | ३ |
| ,, नरहरी दंडी | १६ | ६१ | १० | ४ |
| ,, सुजीतरथ | १७ | ७२ | ११ | ३ |
| ,, सूर | १८ | ५८ | ० | ८ |
| ,, पर्वत | १९ | ५० | ८ | २१ |
| ,, मंडुकरशा | २० | ५२ | ४ | ० |
| ,, तोडरमल | २१ | ४८ | १० | २९ |
| ,, भीमदंडी | २२ | ४७ | ८ | १७ |
| ,, नरहरी | २३ | ४७ | ११ | ० |
| ,, पूर्णमल | २४ | ४४ | ८ | १७ |
| ,, सारंगदंडी | २५ | ५६ | ० | ० |
| ,, रूप | २६ | ५४ | १० | २ |
| ,, अभिमन्य | २७ | ५१ | ११ | ८ |
| ,, धनपाल | २८ | ४८ | ७ | ४ |
| ,, भीम | २९ | ५८ | ५ | १५ |
| ,, लखमीदंडी | ३० | ४८ | ११ | २१ |

एकूण पुरुष ३० वर्षे १८५६ मा ११ दि १२

याउपरी लखमीदेवाचा वजीर वीरसेन होता. त्यानें लखमीदेवास मारून राज्य घेतलें पुरुष १० य॥ मु॥ जमाहो

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा वीरसेन | १ | ५७ | ९ | १७ |
| ,, शूरसेन | २ | ४२ | ८ | ११ |
| ,, वीरशा | ३ | ४२ | १० | ७ |
| ,, अनग | ४ | ४७ | ८ | २३ |
| ,, हररूप | ५ | ४५ | ९ | १७ |
| ,, शूरसेन | ६ | ४३ | ३ | ४ |
| ,, पर्वत | ७ | ४२ | ९ | २४ |
| ,, शूरपाल | ८ | ३८ | २ | ५ |
| ,, द्रुपद | ९ | ३५ | ४ | १४ |
| ,, पृथ्वीपाल | १० | २१ | ८ | ११ |

एकूण १० पुरुष वर्षे ४१८ मा २ दि १३

याउपरी नरहरिनाथ होता त्यानें पृथ्वीपालास मारून राज्य घेतलें.

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा नरहरी नाथु | १ | ३५ | १० | ८ |
| ,, जेतसिंग | २ | २७ | ७ | १९ |
| ,, बेरागमल | ३ | २१ | २ | १३ |
| ,, दिपपाल | ४ | ३५ | ४ | १ |
| ,, महाबळ | ५ | ४५ | ८ | ७ |
| ,, अमृतपाळ | ६ | २८ | ८ | १० |
| ,, तेजपाळ | ७ | २८ | ११ | १० |
| ,, माणिकचंद | ८ | २७ | ७ | २१ |
| ,, कामचंद | ९ | ४२ | ५ | १० |
| ,, हरगौण | १० | ७७ | ० | ११ |
| ,, जीवनगौण | ११ | २३ | ९ | २७ |

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा रिध्यचंग | १२ | २३ | ७ | २९ |
| ,, भार्गव | १३ | ३५ | २ | २० |
| ,, उदीतकंठ | १४ | २३ | ११ | २४ |

एकूण पुरुष १४ वर्षे ४७९ मा २ दि ०

याउपरी उदीत कंठाचा मंत्री होता त्यानें उदीतकंठास मारून राज्य घेतलें.

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा मंत्री | १ | १४ | ४ | ० |
| ,, चंद्रपाळ | २ | १६ | ८ | २४ |
| ,, सुंदरपाळ | ३ | २१ | ४ | १८ |
| ,, देशपाळ | ४ | ११ | ० | ११ |
| ,, रामपाळ | ५ | ४७ | ११ | १२ |
| ,, माधवपाळ | ६ | १० | ८ | २ |
| ,, राजपाळ | ७ | ४० | १० | १० |
| ,, गोविंदपाळ | ८ | १८ | ७ | ० |
| ,, भीमपाळ | ९ | १६ | १० | १३ |
| ,, अमृतपाळ | १० | १६ | ७ | १९ |
| ,, बालपाळ | ११ | १२ | १ | १३ |
| ,, मदनपाळ | १२ | १९ | ११ | १३ |
| ,, भूपाळ | १३ | १४ | ९ | २२ |
| ,, हरपाळ | १४ | १३ | ३ | ४ |
| ,, कर्मपाळ | १५ | १५ | ० | २५ |
| ,, विक्रमपाळ | १६ | १९ | ११ | १३ |

एकूण पुरुष १६ वर्षे ३१० मा २ दि. १९

याउपर नृपसिंग राजा यांनें राजा विक्रमपाळास मारोन राज्य घेतलें

| | पुरुष | वर्षें | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा नृपसिंग | १ | १२ | ० | ७ |
| ,, उदयपाळ | २ | ६ | ५ | ५ |
| ,, श्रीपाळ | ३ | ८ | २ | १ |
| ,, केशवपाळ | ४ | ३ | ३ | २९ |
| ,, सादतपाळ | ५ | १० | ० | १८ |

एकूण पुरुष ५ वर्षें ४० मा. ० दि ०

या उपरी राजा सादतपाळ यास राजा विक्रमजित् यानें मारून राज्य घेतलें.

| | पुरुष | वर्षें | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा विक्रमजित | १ | १२ | ७ | १९ |
| ,, रामचंद्र | २ | १३ | ३ | ७ |
| ,, श्रीचंद्र | ३ | १४ | ९ | १४ |
| ,, मुचुकचंद | ४ | २ | २ | ० |
| ,, कल्याणचंद | ५ | १० | ५ | ४ |
| ,, सूरचंद | ६ | १६ | ३ | १ |
| ,, भीमचंद | ७ | १६ | ३ | १ |
| ,, गोविंदचंद | ८ | ११ | ७ | १२ |
| भावती गोविंदचंदाची स्त्री तिनें राज्य केलें | ९ | १ | ० | १८ |
| राजा प्रतिमल भावती उपर राजा झाला | १० | ७ | ५ | १९ |
| ,, गोविंद | ११ | १९ | ७ | १८ |
| ,, पूर्णप्रेम | १२ | ७ | ७ | १९ |
| ,, महानद | १३ | १५ | ७ | १८ |

एकूण पुरुष १३ वर्षें १४८ मा १० दि. ०

या उपरी जयसिंग बंगालियाहून आला त्यानें महानंदास मारून राज्य घेतलें.

| | पुरुष | वर्षें | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा जेसिंग | १ | १८ | ५ | २१ |
| ,, सूर | २ | १२ | ४ | १२ |
| ,, क्षीरसेन | ३ | १५ | ७ | १२ |
| ,, माधवसेन | ४ | ११ | ३ | १३ |
| ,, देवसेन | ५ | २० | ८ | ५ |
| ,, शूरसेन | ६ | ५ | १० | [illegible] |
| ,, कल्याणसेन | ७ | ४ | ८ | २[illegible] |
| ,, हरीसेन | ८ | ५ | १० | |
| ,, ब्रह्मसेन | ९ | ८ | ११ | |
| ,, नारायणसेन | १० | ५ | २ | १[illegible] |
| ,, लखमीसेन | ११ | २६ | ७ | १५ |
| ,, दामोदरसेन | १२ | ११ | ५ | १[illegible] |

एकंदर पुरुष १२ वर्षें १४७ मा १ दि. ५

याउपर राजा माधवसेन उत्तरेहून आला त्यानें दामोदरसेनास मारून राज्य घेतलें

| | पुरुष | वर्षें | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा माधवसेन | १ | १७ | १० | [illegible] |
| ,, दीनसेन | २ | १४ | ५ | |
| ,, रणसिंग | ३ | १२ | ३ | १[illegible] |
| ,, सेरासिंग | ४ | १० | ८ | ११ |
| ,, वीरसिंग | ५ | ४५ | ० | १४ |
| ,, नृपसिंग | ६ | ८ | ० | ४ |

एकुण पुरुष ६ व. १०८ मा ४ दि. ९

थाउपर धीरंधर राजा यानें नृपसिंगास मारून राज्य घेतलें.

| | पुरुष | वर्षें | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा धीरंधर | १ | ४२ | ७ | • |
| ,, सेन | २ | ५६ | १० | ९ |
| ,, कंठ | ३ | ४५ | २ | ८ |
| ,, महादेव | ४ | २० | २ | ६ |
| ,, वीरनाथ | ५ | २५ | ५ | २५ |
| ,, जीवन | ६ | ४१ | २ | २५ |
| ,, उदयसिंग | ७ | ३७ | ४ | २९ |
| ,, कुलानंद | ८ | ५२ | ३ | ८ |
| ,, लल्हाट | ९ | १० | १ | १३ |
| | पुरुष ९ | व ३३२ | मा ३ | दि. २३ |

थाउपर पृथ्वीपाल पूर्वेहून आला त्यानें लल्हाटास मारून राज्य घेतलें.

| | पुरुष | वर्षें | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा पृथ्वीपाल | १ | १४ | ५ | ७ |
| ,, दुर्जनपाळ | २ | ११ | ० | १३ |
| ,, उदयपाळ | ३ | १३ | ७ | १४ |
| ,, चट (?) पाळ | ४ | १० | २ | १९ |
| ,, दिठोरा | ५ | ३६ | ४ | १७ |
| | पुरुष ५ | व. ८५ | मा ८ | दि १० |

तिरीज एकंदर

| | पुरुष | वर्षें | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा युधिष्ठिर | ३० | १८५६ | ११ | १२ |
| ,, वीरसेन | १० | ४५८ | २ | १३ |
| ,, नरहरी | १४ | ४७९ | २ | ० |
| ,, मंत्री | १६ | ३१० | २ | १९ |
| ,, नृपसिंग | ५ | ४० | ० | ० |

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| ,, विक्रमजित् | १३ | १४८ | १० | ०६ |
| ,, जैसिंग | १२ | १४७ | १ | ५ |
| ,, माधवसेन | ६ | १०८ | ४ | ९ |
| ,, धीरंधर | ९ | ३३२ | ३ | २३ |
| ,, पृथ्वीपाल | ५ | ८५ | ८ | १० |

पुरुष १२० व. ३९२६ मा. १० दि. १

याउपर राजा दिठोरा यास मारून मुसलमान पातशाहा झाले

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| सुलतान रुकंदीन | १ | २३ | ९ | ९ |
| ,, बाहवद्दीन | २ | २५ | ० | ९ |
| ,, समसद्दीन | ३ | २९ | ४ | १२ |
| ,, कुतूमदीन | ४ | २७ | ७ | ५ |
| ,, शहादीन | ५ | ० | ४ | १९ |
| बिबीनें पातशाही केली | ६ | ७ | ३ | १८ |
| सुलतान नसरदीन गोरी | ७ | १७ | ५ | २९ |
| ,, यासदीन गोरी | ८ | ३ | २ | २१ |
| ,, मोहीदीन गोरी | ९ | २३ | ७ | १२ |
| ,, हुसेन गोरी | १० | १४ | ३ | १७ |
| ,, जलालदीन गोरी | ११ | १६ | ४ | ० |
| ,, फुतबदीन गोरी | १२ | १० | ९ | ० |
| ,, याकूदशहा गोरी | १३ | १३ | १० | ६ |
| ,, शहा समसीदीन गोरी | १४ | १३ | ९ | ९ |
| ,, अलाददीन गोरी | १५ | २७ | ७ | १३ |

पातशहा सेतु पावेतो कारभार
फौज घेऊन गेला समुद्रा-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | पावेतों फौज जाऊन सर्व अंध होऊन बुडाली. खासा बरोबर बाबीन, काबील, दोघे सिपाई खासादेखील तिघेजण राहिले. तेथें करामती पाहून समाधी जीत घेतली त्याच्या उपर बत्ती व पुतळे पातशहाचे आहेत चिऱ्यावर पारसी लिहिले असे. हल्लीं सेतुवर पूजा व करामती चालत आहे हें सत्य असे | | | | |
| सुलतान | कुतुबुद्दीन | १६ | ४ | ९ | १३ |
| ,, | गयासद्दीन गोरी | १७ | ५ | १ | ९ |
| शाहा | सरमस्त गोरी | १८ | ३७ | ९ | १३ |
| सुलतान | शहा गोरी | १९ | ३१ | ९ | १७ |
| ,, | अमीनशा बिन महमदशहा | २० | २३ | ५ | ० |
| ,, | महमदशहा बिन अमिनशाह | २१ | १७ | ० | ११ |
| शाहा | कुली बिन फेरोज | २२ | २२ | ७ | ९ |
| सुलतान | तगबुडी यानें जुनी दिल्ली मुस्तैद केली हल्लीं खराब असे व सालेर व नहरे किल्ले बांधिले | २३ | ४६ | ४ | १२ |
| ,, | दुरुमशाहा गोरी | २४ | ८ | ६ | १५ |
| ,, | महमद कुतुबुद्दीन पातशहा | २५ | ६ | ४ | १२ |
| ,, | नसरदीन गोरी | २६ | १० | ७ | १२ |
| ,, | मचूशा | २७ | १९ | ५ | ७ |
| ,, | तोडवशा | २८ | १३ | ५ | ७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सुलतान | मुबारंगशा | २९ | १७ | ७ | १३ |
| ,, | अलाउद्दीनपठाण बिन महमुजी | ३० | १६ | ११ | ० |
| ,, | हुसेनशहा पठाण | ३१ | १५ | ११ | २७ |
| ,, | बलोलखान लोधी | ३२ | ४२ | ७ | ७ |
| शाहा | शिकंदर बिन बलोल-खान लोधी | ३३ | १९ | ७ | १३ |
| सुलतान | इभराइमशा बिन शिकंदर पातशहा | ३४ | १६ | ११ | २७ |
| ,, | सिंधु खेतरी इरामखोर | ३५ | ५ | ० | १५ |
| ,, | शाजिशा बिन मुबारंगशा | ३६ | २ | ७ | १[illegible] |
| शाह | महंमद उजी | ३७ | ७ | ७ | १[illegible] |
| सुलतान | बाबरबकस | ३८ | ० | ३ | [illegible]० |
| [illegible] | तेमूर चक्रते | ३९ | ७ | ७ | [illegible] |
| ,, | बाबर | ४० | ४ | ९ | १५ |
| ,, | हुमाऊ | ४१ | २० | ४ | १६ |
| ,, ,, ,, | सेरशाह पठाण याणी दुसरी याणी जोरा करून हुमाऊस धुंडाउन बले पातशाही केली | ४२ | ११ | २ | १[illegible] |
| ,, | सिलीमशा बिन सेरशा | ४३ | ८ | ९ | १५ |
| ,, | फेरोज बिन सिलीनशा | ४४ | ३ | ० | ० |
| ,, | महमदखान गाजी | ४५ | ३ | २ | १८ |
| ,, | इबराहिमखान भिसधी | ४६ | ५ | ० | ० |
| | हेमुवकाल, शिकंदर शाहाचा वजीर होता त्यानें पातशाही केली | ४७ | ० | ८ | ० |
| ,, | हुमाऊ पातशहा याणी मागती जोरा करून हेमुवकाल पठाण त्यास मारून पातशाही केली | ४८ | १० | १० | २० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ,, | आकबर कलवी शाहागाजी | ४९ | ५१ | ९ | १५ |
| ,, | जहागिर पातशाहा | ५० | २० | ० | ० |
| ,, | खुशरु शहरयार बिन जहांगिर | ५१ | ० | ० | १४ |
| ,, | शाहाजादा पातशा | ५२ | ३१ | १ | १४ |
| शाहा | नौरंग पातशा यांचे भाउपुरुष १ दारा शेको १ शहासुजा १ मुरादबकस १ खासा नौरंगशा सदरहू भाऊ मारून बापास कैद करून पातशाही केली मुदती वर्षे सन १०६८ हिजरी दस्तावर बसले ५२ हिजरी ११२० (?) मृत्यु पावले नौरंगशाचा जन्मकाल इ॥ शके १५३९ कालयुक्तनाम संवत्सरे सन हिजरी १०२७ ता॥ आयुष्य मुदती वर्षे ८९ शके १६२८ व्ययनाम संवत्सरे सन हिजरी १११६ अकराशें सोळा | ५३ | ५२ | १ | ० |
| | पुरुष | ५३ | ८८३ | ६ | ९ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ प्रत स. ३ नं. ८०१ ता. ठा. क.

नौरंगशा मृत्यु जाहला त्या नंतर धामधूम झाली वर्षे अलीकडे शाहा किरकोळ त्याची नांवनिशी लिहिली नाही

| | | | |
|---|---|---|---|
| शके १६६० कालयुक्तनाम संवत्सरे पातशहा महंमदशा | ३२ | ० | ० |
| | ५१५ | ६ | ९ |

पैकीं पठाण वगैरे मुसलमान पातशा झाले वर्षे सुमारें नावनिशी वर आहे वर्षे ६८५ बाकी चकते पातशाही, तैमूर, बाबर, हुमाऊ, अकबर, जहांगीर, खुश्रु, शाहाजहा, नौरंगशा अलीकडचे अहमदशा वर्षे २३० म ८, दि ४

**बेरीज एकंदर**

| | पु. | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्रराजे** | १२० | ३९२३ | १० | ९ |
| **पातशा मुसलमान ता॥ नौरंगशा** | ५३ | ८८३ | ६ | ६ |
| | १७३ | ४८०७ | ४ | १५ |

| | | | |
|---|---|---|---|
| **धामधूम झाली पातशा महमंदशापर्यंत** | ३२ | ० | ० |
| | ४८३९ | ४ | १५ |

दक्षिण सुभे ६ कानगो बरू जोधपुरकर कीर्द

नौरंगशा दक्षण तनखा नौरंगमबाद वसूली तपसील

| | |
|---|---|
| नौरंगमबाद खोनस्ते बुनियाद | १,२३,७६,०४२ ॥≈॥। |
| सुभे वराड आलजपुर | १,१५,२३,५०८ ।॥≈॥। |
| सुभे खानदेश बराणपुर आशेर | ५७,४९,८१९ ८८॥। |
| सुभे मुहमदाबाद बेदर नांदेड | ७४,११,८७९ ।॥०। |
| सुभे विजापुर दारु नजार | ७८,५८,५६० ।॥≈। |
| सुभे भागानगर फुर खुद बुनियादी | ६,४८,६७,४८३ |
| एकंदर | १०,९८,६७,२९४ ।≈॥। |

सदरहू राजे व पातशहा जाले व तनखे दक्षण सुभे वसूली तपशिल राजेश्री निराजी रावजी हेजीबा वकील कारकिर्दे राजश्री राजेस्वामी कैलासवासी थोरले ते समई रायगडाहून लेहून पाठविले जे दिल्लीची वंशावळी पाठविजे.........ते समई

मुक्काम औरंगाबाद सत्तावीस किल्ले दिघले जाहागीर बाळापूर व अवदेप्रांत वराड वगैरे होती ते समई समागमे मजुमुचे नि।। जे कारकून अनाजी रंगनाथ मळकरे व येसाजी मल्हार वाईकर सुरनीवीस पातशाही दप्तरी मुत्सदी त्यास दरबार खर्च देऊन पारसीची नक्कल हिंदवी करून घेतली रायगडास राजेश्री राजे स्वामीपासी पाठविली त्याची तालीक रंगनाथ मळकरे त्यापासी होती त्याचे पुत्र खंडो अनाजी मळकरे त्यापासी नक्कल होती सदरहुप्रमाणें लिहिली असे.

वंशावळी मालोजी व विठोजी भोसले याचा मूळ पुरुष बाबाजी भोसले पाटील मौजे हिंगणी व बोरडी देऊळगाव वगैरे ता। पाटस प्रांत पुणें त्याचा विस्तार तपशील बाबाजी भोसले त्याचे पुत्र २

## तपशील

वडील पुत्र मालोजी भोसले त्यास पुत्र २ ता। वडील शहाजी राजे धाकटे सरफूजी राजे यास पुत्र त्रिंबकजी राजे त्यास पुत्र गुणाजी त्याचा वंश चंदावर आंती होता

धाकटे पुत्र विठोजी भोसले त्यास पुत्र ८ खलोजी राजे, मंबाजी राजे किरकोळ ६ त्यांचीं नांवे विदित नाहीं वडील खलोजी राजे सोनकर्ण पातशाहानी नांव ठेविले होते दिल्लीहून सिवाजी राजे देशास पळोन गेले त्या रागें औरंगशा यानी बल करून तख्तापुढें मारिले मनसूफदार होते

## कलम १

या उपरी गावामध्यें मालोजी राजे व विठोजी कसबे वेरूळास नि।। दौलताबादेस राहिले शेते करून होते त्या उपरी त्या स्थली बायका ठेऊन चाकरीच्या उमेदवारीनें कसबे सिंधखेडास आले राजश्री लखोजी जाधवराव देशमूख सरकार दौलताबाद व मनसुबदार नि।। निजामशाहा पातशाहा बारा हजार घोडीयाची दौलत होती त्यास भेटून चाकरी दरवाज्यावर भोईबारगिरी कबूल करून राहिले शरीरीं पुष्ठ होते घा‍े त्याखाली टिकेना, त्यास्तव दारी डाहळणेस ठेविलें पक्किचे भोजन वेतन दरमाहा होन प्रमाणें दर आसामीस पांच होन ५ यकून दोघास १० प्रमाणें देत होते त्या उपरी बायकाही उभयतानी त्या स्थळी आणिल्या हे हकीकत

## कलम २

त्याउपर त्या स्थळीं विठोजी भोसले यास पुत्र आठजण झाले. खेलाजी व मंबाजी वगैरे देखिल आले मालोजी भोसले त्यास पुत्र जाले नाहींत त्याचे स्त्रीनें नवस नगराचे पिरास केला, जे, आपल्यास पुत्र जाला तर तुमचीं नावें ठेवीन. शहा शरफ पीर होते त्याणी नवस पुरविला पुत्र दोन जाले वडील शहाजी राजे व धाकटे शरफाजी राजे भोसले दोघे पुत्र होते त्या मुलामध्यें उत्तम स्वरूप शहाजी त्याची वहुत होती लखजी जाधवराऊ त्यास पुत्र नव्हता एक कन्या जिजावा होती. शहाजी राजे यांचें उत्तम स्वरून पाहून त्यास वस्त्रें व उत्तम अलकार केले महालात नेऊन खेळवू लागले

## कलम ३

याउपर शहाजी राजे त्यास वर्षे पाच जाली लखोजी जाधवराऊ यास कन्या जिजाऊ तीन वर्षांची होती. शिमगा सण आला रोस्त (?) माउले कुळ मराठे व शिपाई कचेरीस सभा केली. रागरग कलावत नाच माडला जाधवराव यानीं दोघां मुलांस मांडीवर घेऊन गुलाल बुका पुढें ठेऊन खेळू लागले. कवतूक जाधवराऊ पाहु लागले मांडीवर मुलें दोघें आहेत, तों चित्तामध्यें उद्गार आठवून सभेमध्यें बोलिले जे, जिजाऊसारिखे रत्न कन्या स्त्रीनें पैदा केली आहे ईस वर योग्य शहाजी हे मूल उत्तम इजोगा होईल तर बरे आहे. स्वाभाविक चित्ता सहज स्थितीनें सभेमध्यें सभानायक त्यापासी बोलो लागले, तों पाठीसी मालोजी व विठोजी भोसले बारगिर याणीं गोष्ट ऐकिली ते समई उभयता उभे राहून बोलिले आजपासोन जाधवराव आमचे व्याही जाले थोर लोक सभेमध्यें बोलिल्यावर मागें सरणार नाहीत सभेमध्यें गोतगगा सभानायक आहेत तुम्ही समक्ष साक्ष असा याउपरी आमचे व्याही, जिजाऊ आमची सून जाली ऐसी गोष्ट नेटे बोलिले मालोजी व विठोजी बोलोन गोष्टी ठेउन खाली बसले; जाधवराव याणी उत्तर दिधलें नाहीं, बोलोन विचारी पडले

## कलम ४

त्याउपरी सभा खेल जाहला, जाधवराव माहालात गेले शहाजीस स्मागमें

त्याचे ते नेले नाहीं जिजाऊ मात्र घेऊन गेले हें वर्तमान माहलांत बाईकास विदित जाले लखोजी जाधव त्याशी बाईकांनीं भांडण केलें जे, कुणबी पाटील तुमचे बारगिर देशनिकाले पोटासाठीं चाकरी कबूल करून राहिले आमचे हमतोल नव्हेत तुम्हांस आणिखीं मुलुखामध्यें सोइरे देशमुख व मनसबदार हमतोल पाहून बोलावे, त्यानीं कचेरीस गोष्टी ठेवून गेले तुम्हीं त्यास झाडून टाकिले नाहीं, उत्तर दिले नाही ऐसी बोली बाइकानीं जाधवराव त्यासी केली जाधवराव त्याशी उत्तर दिधले जे आम्ही स्वाभाविक बोलिलो, पाने खोबरे वाटिले नाहीं त्यानी लबाडी केली. याउपरी यास चाकरीतून दूर करू असे बाईकाचे समाधान केले दुसरे दिवसी भोजनास मालोजीस व विठोजीस बोलाविले. त्यानी बोहून आणिले. तुम्ही सोइरे जालेस आम्ही लग्न समयीं भोजनास येऊ असे उत्तर दिधले. त्याउपर जाधवराव भोजन करून कचेरीस येऊन बसले कारकून बोलाउन हिशोब करून मालोजी व विठोजी भोसले उभयतास चाकरीतून दूर केले. तुम्ही आम्ही सोइरे नाहीत. पानें वाटिली नाहीत, गला पडता, तुफान करता, याउपरी तुम्ही येथून कबिला व मुले सहवर्तमान जाणें येथें एक घडी न राहणें. त्याजउपरी मालोजी व विठोजी भोसले बाईकामुलें घेऊन मागती येरुळास आले. पाटलास भेटून घर व शेत पूर्वीचे मागती करू लागले.

## कलम ५

याउपरी शेतें २-३ वर्षे केली त्यांची स्थिती, पहिले पासून स्नानें केलीया वाचोन व श्री शिवलिंग पूजा व बेलपत्री सांगपूजा केल्यावाचोन अन्न घेणें नाहीं व एकादशी, सोमवार, प्रदोष व ब्राह्मणाचें तीर्थ घेतल्यावाचून अन्न घेणें नाहीं. पुरातन दडक होता. त्याउपरी शेतामध्यें उभयता भाऊ राखन मालीयावर होते. माघ मासी शुद्ध पक्ष चांदणें पौर्णिमेचे होतें मध्यें वारुळ एक होतें. श्री भवानी प्रसन्न जाली. हात चुड्यासहवर्तमान निघोन मालोजी जागत होता त्यास पालविले. वीज झमकती ऐसे दृष्टीस पडले. त्याउपरी विठोजीस निद्रा लागली निद्रेमध्यें होता जागे करून दृष्टांत सांगितला त्यानें दृष्टांत लटका केला तुम्हास झोंपे घेरलें तुम्ही निद्रा करणें मी जागत बसतो त्याउपर मालोजीस निद्रा

लागली निद्रेमध्यें श्री भवानी येऊन शुभ्र पातळ भर कुंकू मोती व अलंकार युक्त उभी राहोन पाठीवर हात ठेवोन जागें केलें. उठ उठ, जागा होई तुजला मी प्रसन्न जाले. या वारूळात सर्प आहे ते स्वरुप माझे, त्यास नमस्कार करून वारूळ खणून सात कढया माल घेणें. सर्प जाईल त्याचे वटेस न जाणें तुम्हास सत्तावीस पिढ्या राज्य दिधले प्रसन्न जाले हे आभय आहे. जे चित्ती धराल ते होईल हे आभय आहे श्री भवानीनें दिधले

## कलम ६

त्याउपर हे स्वप्न भाऊ विठोजीस श्रुत केले, माल उकरून सात कढया माल रातोरात गावात गाडीयावर घालून परसात पेव खणून पुरून ठेविला त्याउपर शेत-पोत विल्हे सगला लावून बायका व मुलें तेथें गुप्त ठेउन कसबे श्रीगोंदे उर्फ चांभार-गोंदे यास आले तेथील सावकार पुरातन शेषापा नाईक पुंड लक्षापती होता त्याची जाऊन भेट उभयतांनी घेतली पहिला दडक होता त्यामुळे त्यास भेटून एकांती सर्व वर्तमान इत्तकदीन ता। सांगितलें त्याज उपरी आमचे मनोरथ पूर्ण करणें त्याणी कबूल केले उभयतास बहूत आदर करून वचन मागितलें, जे तुम्हास राज्यपद जाले तर आम्हास काय द्याल ? त्याणी पोतदारी वतन कबूल करून पत्र करून दिधले हे शफुत व सनद करून दिधली याउपर त्यास अभ्यक करून उत्तम अलंकार वस्त्र देऊन गाडीवर बसवून कारवान बाहेर राहिले होते हजार घोडी उत्तम कारवानापासून खरीद केली बारगीर व खासदार व जीनगीर सीले व पाखरा उत्तम जीन सामान तयार केला डेरे पालख्या तयार करोन व जगपाळ निंबाळकर फुलटणकर बारा हजार फौज त्याजपासी पुढावे करोन मध्येंच होते त्याजकडे हजीब पाठवून काल आणून त्यास जाऊन भेटले मुद्दा कुल जाहीर किलें, जे आपल्या समागमें दोन हजार स्वार उत्तम देणें आम्हापासी हजार एकूण तीन हजार फौजनिशी सडे जाऊन लखोजी जाधवराव सिंदखेडकर त्यासी दावा सोगाईचा करून तुम्ही मदत करणें, त्याणी कबूल करून फौज दोन हजार समागमें दिधली उभयतां पाटील हजार येकून तीन हजार स्वार उत्तम भले सिपाई स्वार होऊन सोगाईचा दावा करावयास गेले

## कलम ७.

त्याउपरीं जगपाळ निंबाळकर त्याची फौज घेऊन श्रीगोंदे येथें येऊन डेरा-दांडा ठेउन सडे तीन हजार फौजेनिशीं निंबेदेव्हारे घाट उतरून नेवासे याजवरून गंगातीरास आले सीकार केली डुकरे दोन मारून समागमें रातोरात घेऊन रोजे निसबत दौलताबाद तेथें मसीदीमध्यें मेले डुकर दोन टाकिले त्याच्या गळा चिठ्या निजामशा पातशहा त्यास अर्ज लिहिली जे, लखोजी जाधवराव देशमुख श्रो मा त्याची कन्या जिजाऊ आमचे पुत्रास शहाजीस देऊ केली सिमगा पोस्त हजर मजलसीमध्यें बोलिले त्या उपर बायकाचे बोलें बेमानी करून आम्हास चाकरीतून हसकत करून कबिलेसुद्धां बाहेर घातले यास्तव आपण व जगपाळ निंबाळकर याचा आसरा करून मसीदीमध्यें डुकर मारला याउपर पातशाहा आमची दाद देतील, सोगाई आमची आम्हास देववितील, तर उत्तम आहे. नाहींतर जेथवर पातशाहीमध्यें तुमच्या मसीदी तेथें डुकर मारून अशा चिठ्या लिहून डुकर टाकू(न) रातोरात माघारे गंगा उतरून फुलटण देशास व जगपाळ निंबाळकर त्यापासी आले प्रातःकाळीं मुनावर मसीदीमध्यें निमाज पढावयास गेले तो डुकर दोन गळा चिठ्या पाहिल्या बहुत कष्टी होऊन डुकर उचलोन दौलताबादेस पातशाहा होते, तख्ती बसले होते, ते समई पुढें आणून टाकिले चिठ्या पातशहानीं वाचून पाहिल्या बहुत क्रोधायमान जाहले लखोजी जाधवराव देशमुख त्यास तलब स्वार आबादी पाठविले जाधवराव जेवीत होते ते समई तलब पोहोचली जेविता ते समई द्वाही देऊन तैसेच उठविले. तेच क्षणीं पुढें साडून दौलताबादेस आणिले पातशहाचे भेटीस जाऊन कुर्नीस केली उभे राहिले पातशाहा बहूत क्रोधायमान होऊन चिठ्या पुढे टाकिल्या डुकरे दोन दाखविले पातशहा बोलिले, जे, आणिक कोणी उमराव असता तर हतीखाली घालून मारून टाकिला आसता याउपर विठोजी व मालोजी भोसले त्यांचे पुत्रास शाहाजीस जिजाऊ देऊन लग्न करणें, त्यांचें समाधान करणें, या गोष्टीस ढील केली तर त्याणी आणिक दावा केला तर तुमचा मुलाहिजा होणार नाहीं, असे पातशाहानीं ताकीद केली जाधवराव बहूत घाबरे होऊन आर्ज केला.

## कलम ८.

याउपर लुखजी जाधवराव देशमुख याणी आर्जे पातशाहास केला, जे, पातशाहा आभय देतील शिरी हात ठेवितील, तर आर्जे करीन त्यावर पातशाहानीं आभय दिल्हे, जे, जो सुद्दा तुमचा आसेल तो कबूल केला, त्यावरून कुरनिगाती करून आर्जे केला, जे, मालोजी व विठोजी त्याचा पुत्र शाहाजीस आपली कन्या जिजाउ पातशहाचे हुकूमावरून आपण देतो अैसी यासी पातशाहा मेहेरबान होऊन त्यास यकयेकास तिघास मनसफु दौलत बारा हजार घोडीयाची आपल्या बराबर देऊन त्यास कौल देऊन पातशहानीं शर्फराज केले पाहिजे त्याचे अर्जावरून पातशहा मेहेरबान जाले दौलतमनसफु कबूल केली. कौल तयार करून भले माणूस पातशाहानी व जाधवराव त्याणी पाठवून मालोजी व विठोजी व शाहाजी वर देखिले दौलताबादेस आणून भले माणूस जाधवराव सामोरे जाउन आहेर घेऊन आले पातशाहाची मुलाकत जाली शाहाजी वर सुरतवत पाहून पातशाहा खुशवत जाले

## कलम ९.

त्या उपरी पातशहा मेहेरबान होउन सिरपाव हत्ती व घोडे व दौलत बारा हजार घोडीयांची तिघाजणास देउन सरफुराज केली. ज्याप्रमाणे जाधवराव यांची दौलत त्याहून विशेष दौलत दिधली पातशाहानी जाधवराव त्यास हुकूम केला जे कबीला देखील जिजाउ नवरी सिंधखेडाहून दौलताबादेस घेउन येणें, येथें आपले रुबरु लग्न करू. त्याजवरून तमाम लग्न जाधवराव याणी आणून लग्न सिद्धी पातशहा खुद्द उभे राहून दौलताबादेस केले मालोजी व विठोजी यानी कबिला कसबे येरुळाहून आणिला लग्न जाले दौलत जाली. मालोजी राजे यांचे दिवाण कदीम आउजी गोविंद हणमते पेशवे आरंभापासून होते ते जिजाउचे नग जतन करावयास जामदार आण्णा (?) गोमाजी नाईक पान संबाल जाधवराव त्याणी दिधले होते

## कलम १०

त्याउपरी सेतामधील द्रव्य होतें ते काढून धर्म केला श्री घृष्णेश्वराचें देवालय व शिवालय तीर्थ विस्तीर्ण बांधले, व श्री महादेव तेथील तलें मालोजी भोसले त्याणी बांधले ठाईठाई विहीर व बाग केले द्रव्याचा धर्म केला. कीर्ति केली

## कलम ११

त्याउपरी विसापचविसा वर्षांची उंबर शाहाजी राजे भोसले- त्यांस - जाली. जिजाउन(स) पुत्र प्रथम संभाजी राजे जाले होते. त्यासमंई बहिरट(?)निजामशाहा पातशाहा शात अपमृत्यु जाला पातशाहास पुत्र देघे लाहाण मुले साता आठ वर्षांची होती. बायका मुलाच्या आया होत्या साबाजी आनत ब्राह्मण मुछ्दी ( मुत्सद्दी ) थोर आकलवंत होता त्यास बोलावून बायकानीं पुसीले, जे, पातशाहीस वजीर दिवाण पाहिजे. बदोबस्तीस आकलवत मोहरा पाहाणें; त्याजवरून साबाजी आनत याणी पाहता शाहाजी राजे भोसले सुरत ल्याख ( लायक ) देखणे, आकलवत व सिपाहि अैसे जाणून बायकाचे माहालांत घेऊन गेले हा मोहरा दिवाण वजीरी ल्याख आहे असा अर्ज साबाजीपंती केला. त्याजवरून बायकाचेहि चित्तास आले मूल देघे पातशाहाचे माडीवर बसविले सिरपाव दिधला पातशाहाची मुले तक्तावर घेऊन शाहाजी राजे भोसले बसो लागले खालेते वजीर जाधवराव वगैरे लोक मुजरा करूं लागले असा कारभार केला.

## कलम १२

त्याउपर लखोजी जाधवराव देशमुख ह्यास बहूत चित्तामधी दुःख वाटले जे, कुणबी पाटील देशनिकाले आमचे घरी येऊन भोयवारगीर अन्न भक्षून जोरावारीने दावा करून् सोयरीक केली पातशाहाची मुले घेऊन तक्तावर बसतात आम्ही खाले उभे राहून मुजरा करावा हे उत्तम नाहीं. चितामधीं दु ख जालें त्याउपर मनस्बा करून दिल्लीस शाहाजा पातशाहापाशीं कावल ( निरोप ) व आर्जी पाठवून मीर जुमला सुभा साठीं हजार फौज उत्तरेहून आली जाधवराव वगैरे सरदार पुढें जाऊन नरमदातीरीं भेटी होऊन हरोल ( फितूर ) जाधवराव होऊन दौलताबादेवरी चाल केली

## कलम १३

याउपर शाहाजीराजे याणी पातशाही नस .व बायकासमवेत किल्ले माहूलीनजीक कल्याण भिवडी कोंकणांत थोर किल्ला पाहून कांहीं फौज घेऊन कबिलासमवेत तेथें गेले लखोजी जाधवराव ह्याणी मोंगलाची फौज उत्तरेकडून घेऊन पाठलाग करून माहुलीस जाऊन फौजसहवर्तमान वेढा साहा महिने घातला भाडत होते

## कलम १४.

त्याउपर शाहाजी राजे माहुलीस भांडत असता पातशा विजापूरचे त्यास अर्जे वकील पाठविले, जे, आपणावर मोहीम दिल्लीचे पातशहाची झाली. लखोजी जाधवराव याणी हरोलीकरून फौज घेऊन आले घरचा फितवा आपण किल्ला माहुली बळकाउन बसलो पातशाहा कौल पाठवितील, दौलत मनसबी विशेष देतील तर आपण फौज सहवर्तमान चाकरीस येऊ, असे अर्जी पाठविली. त्यावरून पातशाहा विजापूरचे मुरार जगदेऊ दिवाण पातशाही त्याणी कौल व ईमान पाठविले त्यावरून शाहाजी राजे पाच हजार फौजेसहवर्तमान सासरे जाधवराव त्याचा मोरचा रात्रीं मारून रातोरात जिजाउ व पुत्र संभाजी राजे देखील विजापूरचे रोखे चालिले, जिजाऊ गरोदर सात मासाची शिवाजी राजे याचे वेळेस होती दोन तीन कोस जाता मार्गी घोडीवर होती जिजाउ अडली पळवेनासे जाले शाहाजी राजे यास संकट जाले तेव्हा शभर स्वार जिजाऊपाशीं ठेऊन संभाजी राजे वडील पुत्रास घेऊन पळाले मार्गी जिजाउस टाकून पळता शाहाजी राजे जिजाउस बोलीले, जे, तुमचे पिते आमचे मागे पाठिलाग करून येतात त्यास शरम असती तर सोडून हे तीस पळवितील आम्हास तुमची गरज नाहीं असें बोलोन शाहाजी राजे पलोन गेले

## कलम १५.

त्याउपरी लखजी जाधवराव याणी रात्री तेच क्षणी तांत्रास (मोंगलास?) सावध करून महतापाहतीवर घेऊन हरोल होऊन पाठीलाग केला तो मार्गी जिजाऊ उभी राहिली सिपाई जाधवराव त्याचे त्याणी वोळखिली. जाधवराव बाप भेटले समागमें लोकानीं फजीत जाधवराव यास केले जे, जिजाऊ तुमची कन्या व गरोदर तांत्रास जाहीर जाले तर उत्तम नाहीं दावेदार तुमचे निघोन गेले इस कन्येस वाटेवेगळे काढाडणें जिजाऊ सांगाते पाचशें स्वार देऊन रातोरातें किले शिवनेरी निजामशाही किला शाहाजी राजे त्याजकडे होता तेथे जिजाऊस नेऊन घातली, सिवनेरी गडावर श्री भवानी सीवाई तीस नवस जिजाऊने केला जे आपणास पुत्र जाला तरी तुझे नांव ठेविन त्याउपर शिवाजी राजे त्याचा जन्म जाला शक १५४९ पवराशे येकून पन्नास क्षयनाम सवत्सरे

५३३८९

## कलम १६

त्याउपर ते समई लखोजी जाधवराव ताम्राची फौज नगरपावेतों पाठिलाग केला परंतु शाहाजीराजे झाडून विज्यापुरास गेले. पातशहास जाऊन मुलाजमत केली. मुरार जगदेव दिवाण प्रतिनिधी त्याणी आदर पुढें सामोरें येऊन पातशाही भेटी सुलतान सिकंदर त्याची झाली. बहूत सन्मान केला वस्त्रें व घोडे व हस्ती व सिरपाव देऊन बाराहजार घोडीयाची दौलत जाली. जाहागीर कर्नाटक देशी जाली. त्याउपर लुखजी जाधवराव व मीर जुमला सुभा साठीं हजार फौज माघारे दिल्लीस गेली. जाधवराव नर्मदापावेतों जाऊन शरमडली दक्षणची रुमसत होऊन कसबे सिंदखेडास दाखल जाले.

## कलम १७

त्याउपर माहुलीस पातशाही नसल व बायका घेऊन साबाजी अनत मुछदी घेऊन किले दौलताबादेस मागती दाखल जाले दिवाण वजीरी नाहीं यास्तव शोध करिता मलिकंबर किंगसखान विजयापुरकर वजीर कमले मलीकंबर हुसदी याणी फकीरी घेऊन मकेस जाता दौलताबादेस दुकानी झोळी वगून उताणें भेडास पाय टाकून निद्रा केली होती, तों साबाजी अनत पालखीत बसोन बाजारातून जाता मलीकंबर याजवर नजर पडतांच चिन्हें उत्तम देखिली पाई पद्म, शामवर्ण हपसी फकीर नेकजात देखिला सेवक पाठवून जागे करून घरास आपल्या नेले. अभ्यंग उत्तम करून, भोजन उत्तम करून, वस्त्रें उत्तम देऊन येकांती भाषण जाले आणि शफत जाली. बायकाचे भेटीस घेऊन गेले. पातशहाची मुले मांडिवर बसविली. तक्तावर मुले पातशहाची घेऊन बसले. शहरांत द्वाही फिरविली. कुल उमराव देखील जाधवराव येऊन मुलाकत जाली पातशहाची बंदोबस्ती केली त्यावर मीर्जुमला सुभा दिलीहून मागती फौज आली त्या फौजेशी बऱ्हाणपुरानजीक आशेर तेथें भांडण जाले दिलीची फौज मारून माघारी नर्मदापार केली मलीकंबर यास फार जखमा लागल्या फत्ते करून दौलताबादेस आले. मलीकंबर त्याच्या सिक्यातील नांव पारसी बंदे दरगाहा थकानीं मलीकंबर चिंगसखानी हे मुद्रा याप्रमाणें होती.

## कलम १८

त्याउपर मलीकबर फौज घेउन विजयापूर प्रांती श्री. माहादेव वलवसवड पावेतो

येऊन बहूत धामधूम केली साठ हजार फौज होती त्याउपरी मुरार जगदेव शाहाजीराजे व सरज्याखान थोरले व रणदुल्लाखान व तमाम वजीरासमेत अैशी हजार फौज मऱ्हाटे व दक्षणी व पटे वसीले समेत गाढी फौज त्याणी मलीकंबराचा मुकाबला केला मलीकंबर याचा मोड जाला पळतां भीमातीरास मौजे कोरेगांव जि॥ तळेगाव ढमढेरे यांचे येथें आले भीमेस बहूत पूर भाद्रपद मास मलीकंबरास संकट जाले ते समई घोड्याखाली उतरून भीमेस नमस्कार केला तो भीमा दोन भाग जाली कुल लष्कर उतरून पार गेले. मागून आपण स्वार होऊन पैल तिरास जाता भीमा मागती पूर चाललं त्याजवर मुरार जगदेव फौजसह वर्तमान येताच भीमा बहूत पूर देखोन कौतुक वाटले मलीकंबरास सागून पाठविले जे तुमचे पाठीवर यावे तर श्री भीमेनें मार्ग तुम्हास दिधला पैलतिरी तुम्ही उभे राहाणे आम्ही दुरून कुरनीस करू त्याजवर मलीकंबर उभे राहिले समस्तानी मुजरे केले. × × × × त्यावर मलीकंबर दौलताबादेस गेले

## कलम १९

याउपरी मुरार जगदेव कुल फौजसहवर्तमान नागरगाव ता॥ सांडस खुर्द जि॥ पुणे भीमा ईद्रायणी सगम दक्षणवाहीनी तेथे मुक्काम केला फत्ते जाली ते समई शके १५५५ श्रीमुखनाम सवत्सरे दक्षणायने वर्षाऋतु भाद्रपद आमावासिया सूर्यग्रहण सोमवती थोर पर्व देखोन तुळापुरास चोवीस तुळा केल्या. शेवटीं हत्ती × × × छावा होता त्याची तुळा करावयास हुकूम समस्त वजीरास जाला सरजाखान रणदुल्लाखान वगैरे कोण्हाची नजर चालेनाशी जाली ते समई शाहाजीराजे याणी विनती केली, जे, तुम्ही स्नानसंध्या करणें आपण हत्तीची तुळा करतो त्याउपरी शाहाजीराजे याणें सगमा खालता भीमेस डोहो होता. तेथे मोठी नाव रिकामी घालून नावेस खूण करून तर्के देऊन हत्तीस नावेत घातला ते खुण नावेस करून हत्ती नावेतून काढिला नावेंत दगड लोखड घालून हत्तीच्या खुणेपावेतो आणून आभांड बाधले. मग दगड लोखड काढुन तुळा करून वजनी सोने घालून ब्राम्हणास धर्म केला त्या समई मौजे नागरगाव मोडून मौजे तुळापूर नाव ठेविले ब्राम्हणांस अग्रहर दिधले अद्याप गाव दुतर्फा माहाराष्ट्र व तांम्र कुल गाव वतन चालत आहे. शके १२१६(?) खरनाम सवत्सरे माघ मास ते समई चाकण किल्ला पका आमला

तयार होता. खहपसी त्याणे केला. ते समई मलेकरी निमाजगाव मसीद बाधली ते समई मुकपा (?) नवे जाले

## कलम २०

त्याजउपरी कसबे पुणे येथें मोरो तानदेव होनप देशपांडे भुमेगिरी करीत [×× ×××××××××] उत्तम वस मोठे होते त्यापूर्वी चाणकेस बरारब हपसी त्यानें किल्ला पक्का बांधोन मुलुक आमदानगरापासोन तहद वाई, सिरवल, इंदापूर देखील मुलुक मारून पुडाई करीत असता बरारब शात झाला निजामशाहा त्याकडे किला होता त्याउपरी शाहाजीराजे दिवाण जाले याउपरा किला त्याजकडे जाला. मधे हलमाजी जाली त्ये समई मोरो तानदेव होनप देशपांडे जि॥ पुणे पुढ जले त्याउपरी रायराव दिवाण नि॥ मुरार जगदेव याणी स्वारी करून पाळत लाउन राणातून धरून आणिले नखी सुया टोंचून मार देऊन कैदेत होते कसबा पुण्याचा कोट पाडून शहर मारून नागर पाढरीवर धरीला. श्री भुलेश्वरगड बाधला त्याचे नाव दौलत मगळ ठेविले मुलुक वैरान बहूत जाला ते समई शाहाजीराजे याणे तुला हत्तीची केली ते समई मेहेरबान होउन उतरपती कुल मुलुक प्रात जुन्नर चाकण किला व पुणे तहद वाई सीरवळ सुपे इंदापूर हा प्रांत जहागीर दरोबस्त दिधली. ते समई शाहाजी राजे याणी दादो कोंडदेव कुळकर्णी मौजे मळठण ता॥ पाटस प्रात पुणे लिहीणार हिमानी (इमानी) जाणून त्याचे स्वाधीन मुलुक कुळ येखत्यारी (अख्तारी) देऊन ठेविले. पागाहजार सरदार मुक्तसर सिदी हिलाल हपसी तैनाती केले त्याउपरी मुरार जगदेव विजापूरास गेले. त्या समागमें शाहाजीराजे गेले दादाजी कोंडदेव त्याचे स्वाधीन मुलुक केले ते समई सांगितले, जे, चिरंजीव व स्त्री जुन्नरी आहेत त्यास आपल्यापाशी आणून माहाल बाधून उभयतास अन्नवस्त्र देऊन चिरंजीवास शहाणे करणें, हे आज्ञा करून शाहाजीराजे विजापुरास गेले दादाजीपंती शिवनेरीहून जिजाऊ व शिवबास आणून पुणें वसउन लाल माहल बांधून उभयतास बरे इज्जतीने ठेविली वस्त्रे अलकार उत्तम करून आपल्या सन्निध ठेविलें त्याउपरी मोरो तानदेव कैदेतून पळोन मौजे मलकर प्रांत चाकण येथें रंगनाथभट कुळकर्णी व जोसी त्याची मातुश्री फुलाईआवा त्याचे घरास रात्री

पलोन गेले. त्याणी माडीवर गुप्त ठेविले. सा (सहा) मास तेथें होते. कोणास विदित नाहीं ऐसे होते

## कलम २१

त्याउपर शाहजीराजे विजापूर प्रांती कलगिरी पाळे तेथें पाळेगार मवास होता. किल्यास वेढा घातला होता. वडील पुत्र संभाजीराजे त्यास गोळा लागोन शांत जाले त्याचा पुत्र उमाजी राजे स्त्री मकूबाई जितीकर. त्यावरी पाळेगार धरून किल्ला फत्ते केला त्याउपर राजे जाधवराव त्याच्या दाव्यासुळें दुसरे लग्न केले तुकाबाई मोहित्याची कन्या स्त्री दुसरी केली तीस पुत्र येकाजी राजे जाले. जिजाऊ शिवाजीराजे त्याचा त्याग केला मुख पाहणे नाहीं दादाजीपंत पुण्यामध्यें मर्यादीनें जिजाउचे चालवीत होते सिउबास शहाणे केले घोडे फिरविणें ऐसे तरी (?) होते केली. दादापती मोरो तानदेव यास कौल देऊन ज्या स्थळी होते तेथून आणिले. मुलुक कुल आबाद केला चोर नाहीसे केले. मवस मारिले. चार लाडगे बारा वाटा नाहीसे केले आदल इनसाफ बहुत होत. जोतंसुली (?) दिल्हे कसबा खेडबारे त्या स्थली सीवापूर पेठ वसविली बागाई, आंबराई वगैरे झाडेही इरसाल महाराज शाहजीराजे त्याचे नावे केला. आंबा घेतला म्हणून आपला हस्त तोडीत होते. मग लोकानी आर्ज करून आस्तनी कडी केली. हे वर्तमान शाहाजीराजे त्यास विदित जाले सिरपाव पाठविला. ते समई कडी आस्तनी दुसरी केली यानतर सातवे होन पाठविले मुशारा त्याखेरीज जे मीलाले ते पडले पान दिवाणांत जमा ऐसा बहुत दिवस कारभार केला. शाहाजीराजे विजापूर प्रांती होते ते समई मुरार जगदेव दिवाण प्रतिनिधी होते. पातशाहा सुलतान शिकदर शांत जाले मागे पातशाई नसल व मुले होती. बायकानी व बेगम होती तिणें मुरार जगदेव त्यास मजुरीयास बोलाउन तक्तापुढें जीवे मारावे. ते समई कारजे हाउद होता ते समई स्नान करून आतुर सन्यास सिखा उपटून संन्यासी जाले. त्याउपर हातपाय चौरंग करून मारिले त्याउपर विजापूराहून वजीर बरा सरज्याखान वगैरे मुकाम भातोडीस तळें फोडून मलीकनें फौज धाडिली बरावजीर धरून पाडाव केले. सिरपावे देऊन सोडिले

## कलम २२

त्याउपर विजापुरचा मद तुटला शाहजी राजे फौजेसहवर्तमान कर्नाटक बालापूर कोल्हापूर प्रांतीं होते. बराबर फौज बारा हजार होती ते समई चंदावर तेथें पालेगार विजय राघव थोर राजा होता. त्याच्या स्त्रिया पांचशें होत्या. मधेरेचा (मदुरेचा) राजा त्रिचनापल्लीकर यासी भांडण निरंतर होते. यासी मदत शाहाजी राजे जाऊन चंदावरी युद्ध बहुत जाले विजयराघव रती युद्ध करता समरंगणी कमला. ते समई किला चंदावर स्थळ बलें घेतले बहूत द्रव्य सांपडले राज्यकुरु घेतले त्रिचनापल्लीकर त्यासी राज्य घेऊन घ्यावे असा तह ईमान होते. त्यासी बेमानी करून त्यास मारून बाहेर घातले, आपण राज्य घेतले त्या स्थली पुत्र तुकाईचे पोटीचे येकाजीराजे त्याची स्त्री दीपाबाई उभयतां तेथें ठेऊन आपण बालापूर व कोल्हापूर प्रांतीं माहाराज गड तेथें होते. येकाजी राजे त्यास पुत्र तीघे. १ शाहाजी राजे, १ शरफाजी राजे, १ तुकोजी राजे. तुकोजी राजे त्याची संतती झाली असे. सदरहूप्रमाणें येकाची संतती असे

## कलम २३

त्याउपर मलीकंबर दौलताबादेस होते शांत जाले. साबाजी अनंत मृत पावले दिलीचा पातशाहा शाहाजादा त्याणी फौज मिरजुमला त्यासमागमे औरंगजबास देऊन दौलताबाद घेतली खडकी मलीकंबर त्याणी वसविली होती. ते पेठेस कौल देऊन गावकुसू पक्के बांधून औरंगजब त्याणी आपले नांव देऊन औरंगाबाद नाव ठेविले. दक्षिणेस सुभा करून विजापूरप्रांतें मोहिम केली युद्ध तुंबल गुडगीस जाले. दक्षणी सरज्याखान वगैरे त्याणी औरंगजेबास मागे सारिले. फिरून औरंगाबादेस माघारे आले बऱ्हाणपूर खानदेश व आलापूर वराड खोनस्ते बुनीयाद औरंगाबादेती सुभे तेथील कारभार करून होते

## कलम २४

त्याउपर दादाजी कोंडदेव त्याणी बंदोबस्त कारभार यखत्यारीचा केला त्यांचा मृत्यु जाला तेसमई सोळा सतरा वर्षांचे शिवाजीराजे होते त्यानी बहूत शोक दादाजीपंत कमले म्हणोन केला. त्याउपरी खजीना बहूत होता. ते समई शाहाजी

राजे दूर चंदावर प्रांती गेले होते त्याणी दादाजीपतास सांगोन पाठविले, जे, विजापूरप्रांतीं येऊन ते समई खजीना आम्हाकडून पाठविने. तुम्ही आपल्यापाशी ठेवणे. त्यास दादाजीपत मरताच खजीना जप्त शिवाजीराजे यानी केला पागा हजार कुलमता जप्त केली सिदी हिलालहसदी त्यास आज्ञा दिधली. हजूर पाठविले पचवीस हजार मावले चाकर नवे ठेविले. कुल प्रगण्याची बंदोबस्ती केली शामराज निळकठ पारसनीस चतुर सुरत उत्तम त्यास पेशवाई सांगितली. राघो बलाल आ चिटणीस लिहीणार हजूर ठेविले. रघुनाथ बलाल लस्करचे सबनिस केले सिपाई आंगे बहूत होते नव लोक सही केले. पुण्यामध्यें होते शाहाजीराजे त्यास विदित जाले, जे, दादाजी कोंडदेव शांत जाले पुत्रानें आटोप केला. हे विदीत जाले पुत्रास समाधानें लेहून सनदा त्याचे नावे पाठविल्या सिवाजीराजे पुण्यात होते

## कलम २५

त्याउपर औरंगजेब त्याचा व सिवाजी राजे याचा दावा लागला व यास मुळ, जे शाहाज्यादा पातशहा दिल्लीची पातशाही करीत असता बेगम कन्या औरंगशाहाची भगिनी येकोदर होती, तीसी बलात्कार केला. बहिणीनें भावास सांगोन पाठविले, जे, पातशाहीची नजर फिरली. तुम्ही चाल करून पातशाही घेणें त्यावरून दक्षिणचा खजिना तीन वर्षे हजूर दिल्लीस पाठविला नाही. खजीना खर्च करून सीलबंदी फौजेसही केली तमाम लोकास कौल पाठविले.

ते समई सिवाजी राजे यास परवाना पाठविला. पुण्यामध्यें सिवाजी राजे याणी मनास आणिले तेथें मजकूर जो तुम्ही फौज देखील येणें आगर तुम्ही येत नाही तर शामराव निलकठ दिवाण त्याजबरोबर लाटी (?) फौज देऊन पाठविणे. दिल्लीचो पातशाही आपणास आली म्हणजे दौलत मनसफा बापासारिखे देउ. ऐसा परवाना पाठविला त्यास सिवाजी राजे म्हणो लागले, जे तुरकास सलाम करणें उत्तम नाहीं. सामराजपंतही पाठवीत नाहीं. परवाना श्वानाचे शेपटीं बाधोन गावात फिरविला आवदी त्यास धके देऊन बाहेर घातले. त्याणी जाऊन औरंजेबास सांगितले. तेव्हा गांठ चित्तात बसली, जे दिल्ली फत्ते जाल्यावर दक्षिणेस मोहीम आधी शिवाजीवर करून तधी पासोन दावा आजपावेतो चालीला.

### कलम २६

त्यासमई औरंगजेब दिल्लीस जाउन युद्ध केले. उदाराम देशमुख प्रांत माहोरचा तो पडला त्याची स्त्री रायबागीण तिनें युद्ध केले. फत्ते जाली, माहोरप्रांत सरकार जाहगीर व देशमुखी परवाना करून दिधले दाराशाहा व शाहासुज्या व मुरादबकस तिघे भाऊ मारून बाप शाहाजादा त्यास कैद करून डोळे सिवले. कैदेमधे मेले. बहिणीने दिल्लीचे तक्त किल्ला भावाचे स्वाधीन करून औरगशाहा पातशाहा जाले न्वाही फिरली

### कलम २७

त्याउपर तेसमई सिवाजीराजे याणी पत्र निळोजी नीळकंठराव नाईकवाडी किले पुरदर निजामशाही किला बळकाउन भोवताला मुलुक तेथील खडणी घेत होते. इनामगांव होते गावोगाव हक दस्तुरी घेत होते. शाहाजीराजे याचा भाऊपणा बहुत होता त्याजबद्दल शिवाजीराजे याणी पत्र लिहीले, जे, दादाजीपत वडीलसमान होते त्यास मृत्त जाला आपणास आसिरा नाही गडाचे माचीस गडाखालीं येऊन त्यानी उत्तर दिधले, जे, दुसरा विचार नाहीं. तुम्ही अगत्य आले पाहिजे, त्याचे उत्तर येतांच गडाखालीं जाऊन छावणी पागा व पंचवीस हजार मावळे जाऊन राहिले पाउसाला तेथें कमला

### कलम २८

याउपर दिपावली सण आला. निळोजी निळकंठराव त्यास भाऊ धाकटे पिलाजी निळकंठराव, संकराजी निकळंठराव ऐसे तिघे भाउ होते वडील भाउ निळोजी कुळ किल्याचा व गावगन्ना कारभार करीत होते. धाकट्या भावास वाटा वडील देत नव्हेत. अन्नवस्त्र मात्र देऊन येके स्थली होते धाकट्या भावाचें मनोगत येकाती भेट सिवाजीराजे याजकडे अनुसधान लाविले होते. त्यास दीपावली सणाबद्दल जिजाउ व सिवबास सांगावें म्हणून धाकटे भावास वडिलानी धाडिले गडावर आणून दीपावलीचा सण करावा त्यास भाउ धाकटे गडाखाले येऊन आवताणें सागो लागले त्यास सिवाजीराजे याणीं आनमान केला जे, उत्तर दिधले. आपणास उभयेतास लोकांस टाकून येता नये येथें तुमचेच आहे भावास

फिराउन धाडिले आवतणे घेतले नाहीं. मागती तिघा भावानीं विचार केला, जे, शाहजीराजे त्याचा शब्द लागेल. भाउपणा पुरातन त्याची स्त्री जिजाउ व पुत्र असता दिपवालीस नेली नाहीं. यास्तव मागती जाणून उभयतास मातुश्री जिजाउ व सिवबा समेत लोक बारगीर व मावळे बरोबर खास सरदारकुळ लोक एकंदर परवानगी देऊन गडावर समस्तास आणिले पाहिजे भाऊ येऊन समस्तास गडावर घेऊन गेले तीन दिवस न्हाण व भोजन व उत्तम वस्त्रे उभयतास व लोकास प्रतिपदेस देऊन भाऊबीज करून बोळवन करावी प्रतिपदेस भोजन जालौ. रात्रीं जागरण जाले, निळकंठराव स्त्रीसहवर्तमान निद्रा केली प्रातः-काल चार घटका रात्री असता पिलाजी नीलकंठराव व शंकराजी निळकंठराव उभयतानी राजे यास सावध करून निळोजी निळकंठराव याचे पलंगाखाले रेशमी काढण्या घालून बांधले त्याचे स्त्रीस काकीस येकीकडे काहाडून बाजेवर बांधले पाई बेडी घातली. ते समई त्याचे भाऊ उभयेता तेही पाही शृखला घालून खोली-मध्यें ठेवून गडाचे दरवाजे लोक मावळे पाठवून, जागा चौकीया पाठवून त्याचे लोक मावळे पाठवून स्त्रिया देऊन गडाखाले घातले. वस्तभाव घेऊन सोडिली. गड फत्ते केला खर्जाना बीत सापडले निळकंठभाऊदेखील तीन दिवस कैदेत होते. तिसरे दिवशीं सोडिले गडाखाली ह्मीनाम (इनाम) कांहीं देऊन ठेविले. अद्याप नाईकवाडी वतन आहे व इनाम आहेत.

## कलम २९

याउपर चाकण किला तेथें ठाणे दादाजीपंताचे होते तेथें फिरंगोजी नरसाळा हवलदार ठेवून किला आपले स्वाधीन केला त्याउपर राजगड व पद्मावती व संजीवनी व सुवेळा एकूण राजगडचे इमारतीवर नारो त्रिंबक पिंगळे प्रथम चाकरीस ठेविले सिंव्हगड व तोरणा व प्रचंडगड घेतला त्याउपर रायगड वसविला ईमारती करून खासे राजे तेथें मुख्य स्थळ केलें बेरामावळ तेथील चंद्राराव मोरे जाऊनकार (जावळीकर) राजे विजयापूरचे पातशाहास नालबंदी वर्षास देत होते त्याचा दिवाण हणमतराव मोरे कुल कारभार चाळीस हजार मावळे त्याचा सरदार जोवर नजीक श्री माभळेश्वर, तेथें राहत होता. चंद्राराव मोरे त्याच्या कन्या सुंदर उपवर नवऱ्या होत्या सोयीरीकीवद्दल रघुनाथ बलाळ सबनवीस यास हणमतराव मोरे त्याजकडे

सीध्याईस पाठविले झाडी बहूत त्या रानात रघुनाथ बल्लाळ पंचवीस स्वार व शंभर मावळे घेऊन गेले हणमतराव मोरे भेटीस आंगणांत जोते उतरून आले भेटी होताच दंगा करून कटारीनें, तरवारीनें मारिलें. द्वारी दाहा लोक होते. तेही मारून चाईवरून रातोरात पुरधरास राजे याजपासी आले बहूत समाधान पावले. दुसरे दिवसी खुद राजे व मावळे चाळीस हजार घेऊन रात्रीं चालले. तिसरे रोजी श्री माभळेस्वराहून निशाणीचा घाट उतरून जाउलीस गेले. रघुनाथ बल्लाळ सबनवीस त्यासमागमे फौज देऊन रडतोंडीच्या घाटे ते तिकडून आले जाऊलीस वेढा घातला दोनप्रहर पावेतो भाडण जाले गाव घेतला बाजीराव व कृष्णराव व राजे व मोरे पधरा सोळा वर्षांची उंबर होती त्यास स्त्रिया देखील कैद केले. मता द्रव्य बहूत. पुरातन राज्यभग केला. मता नेऊन प्रतापगड घाट माथा कील्ला वस्ती केली मावळे ठेऊन चंदाराव घेऊन पुण्यासी आले

## कलम ३०

याउपर बाजीराव व कृष्णराव मोरे त्यास अभ्यग करून उत्तम भोजन घालून पुणीयाचे दक्षिण भागी निमाजगा त्या स्थलीं शिरच्छेद केला. त्याच्या स्त्रिया कन्या नवऱ्या होत्या आपण सोयरीकी केली नहीं सोडून दिधली. चंदाराव मोरे जावलीकर यांचे राज्ये या प्रकारे घेतले. साठी हजार मावले नवे जुने सही केले.

## कलम ३१

याउपर विजयापुरचे पातशहास जाहीर जाले. शाहाजीराजे कर्नाटकात होते त्यास लिहीले त्यानी उत्तर लिहीले. जे, आपली स्त्री व पुत्र त्याचा त्याग केला. तुम्हास कळेल ते करणे आमचे कांही ऐकत नाही

याउपर आबदुलाखान भटारी पाहिले होते. वजीर होता बारा हजार फौज त्याची होती. दुष्ट तुलजापुर ज्याणें श्री भवानीस उपद्रव केला होता त्यानें पैजेचा विडा घेऊन फौज घेऊन वाईस आला सिवाजी राजे व जिजाउस घेऊन प्रताप-गडास आले साठी हजार मावले होते आबदुलाखानानें आपला खुद दिवाण कृष्णाजी भास्कर शिवाजी राजे त्याजकडेस सिद्याईस पाठविले, जे, तुम्ही येऊन भेटी घेऊन जाणे तुम्हास दौलत शाहाजी परीस देऊन पातशाहास भेटउन. .भेटी

घेणें. त्यास कृष्णाजी भास्कर त्यास उत्तर दिधले जे आपले भेटी घेऊन परतुन लष्करात येणें नाही. प्रतापगडच्या दरवजीयाखालीं बाहेर येथें सदर करून खुद आवदुलाखान व तुम्ही येऊन रुबरु येऊन वचन प्रमाण करून हाती धरून घेऊन जाणे पातशाहाची भेटी घेऊन तुम्हास करणें ते करावे आपण काही लष्करांत अगर बाहीर येथुन येणें नाहीं भेटीस खानास आणिले तर उभयता येणे आपले तर्फेने वकील दत्ताजी गोपीनाथ बोकील मौजे हिवरे नजीक सातवड त्यास पाठविले. उभयतां खानापासी वाईस येऊन हाकीकत जाहीर केली. बहू ताथा-तेनें समजाऊन सांगितले त्याउपर प्रतापगडास जावे भेटी घ्यावी ऐसा निश्चय जाला

## कलम ३२

त्याउपर, दत्ताजीपती राजे यास सांगोन पाठविले कीं भेटीस खान येतो ती भेटीची तुम्ही सरंजामी करणें. त्यावरून सिवाजी राजे त्यानी गडाच्या सन्निध किल्ल्याच्या बुरुजाखाली दरवजीया सन्निध सदर केली. मखमली डेरे, चदाराई कलस, सोन्याचे, व बिछाने तयार केले. त्या खटपटीस अनाजी रंगनाथ मलेकर होता. राजेस्वामीनी ब्राह्मण बोलावून द्रव्य दिधले, कीं, काशीस व गयेस जाऊन उत्तरकार्य करणें. धर्म हस्तके गोदान देखाल दिल्हे दाढी लाहन छाटून टाकली. जिजाऊ रडो लागली. तीस समीप येऊं दिले नाही. साठी हजार मावळे त्यास जागोजाग नाके तेथे ठेविले गडावर तोफा तयार केल्या. जे घटीकेस आपण खानास मारू ते समई गडकरी अवाज करतील, जाय होतील, ते समई लस्कर कुल बुडवणें हे सरंजामी केली, त्याउपरी आवदुलखान याणी कुल तोफा व बुणगे वाईस ठेवून खंडाजी खोपडा रोहिडकर मावळे पांच हजार घेऊन हरोल होता, त्यास घेऊन प्रतापगडाचे रोखे चालता, हत्ती निशाणाचा चालेनासा जाला बहुत केली खानास वर्जीले. परतु ऐकिले नाही हत्तीचे डोळे फोडून दुसरे हत्तीवर निषाण घेऊन चालिला तळे घाटे वेधोन बेलदार झाडे तोडावयास घातले होते रडतोंडीच्या घाटे उतरून पाराजवल काहीना (कोयना) तीरीं खारीमध्यें लस्कर उतरले जाली झाडे तोडावी तेव्हा राहावे. ऐसे करून लस्कर उतरले

## कलम ३३

त्याउपर मागती रदबदलीस कृष्णाजी भास्कर दिवाण व पंताजी गोपिनाथ पाठविले. ज्या उपर तरी लष्करात अगर लष्कराबरोबर येऊन भेटी घेणे त्यानी जाऊन सांगतो असे दोन चार वेला गेले आले परंतु राजे याची यक गोष्ट हटे नीग्रहे ऐकून खान स्वार जाले पुत्रास फाजीलखानास येऊन पालखीत बसून बत्तीस भोई होते. अंगेहि भारी जोरावर होता समागमें खिजमतगार पाचजणे व कारकून कृष्णाजी भास्कर दिवाण दत्ताजीपंत हेर्जाव नि॥ राजे ऐसे पर्वत वेंधून सदरे सनिध आले हे देखोन अगोदर राजे याणे सदरे मागे गर्तामाची खाणून ठेविली त्यामध्यें धारकरी चालीस जणे संभाजी काउजी बंदा व हिरोजी फर्जंद व सोनमाहाला जीवमाहाले वगैरे चालीसजण होते.

## कलम ३४

त्याउपर सिवाजीराजे याणी अंगें चिलखत, त्यावरी बखतर, डोईस टोप डावे हातीं बिचवा, आस्तानींत नवसाकी पटा ऐसा मजबुदीनें गडावर खबरदारी करून तमाम लोकास सावध करून उतरले सदरे सन्निध आले पूर्वेकडून खान येताच पालखीखालीं उतरले तीराचे खासेतून पाई चालत आले. भोई व खिजमतगार मागें दूर ठेउन खान व कृष्णाजी भास्कर दिवाण उभयता सदर वेंधोन लोडाजवळ आले. दत्ताजी गोपीनाथ पुढें येऊन राजे यास विनती केली, जे, खानास जाऊन भेटणें त्यास पुसोन तीन वेला खान हेच ऐसे खरे केले खानाचे क्षेम कृष्णाजी भास्कर यास पुसिले, जे, सिवाजी हेच तीन वेला खरे केले त्यास ते समई उभयताच्या नजरा एक जाल्या. सिवाजी राजे सनिध येऊन पोटात डोई घातली खानानें पोटी कवळून धरीले तेच क्षणीं चपलाई करून बिचवा डावे हाती होता हृदयाखाली पोटी मारिला पोटला येकचे घाई अताडी बाहेरी आली. खान कृष्णाजीपंतास म्हणो लागले जे आपणास मारिले ते समई कृष्णाजी भास्कर याणी तरवार फिरंग होती त्याणे सिवाजी राजे याजवर टाकिली परंतु कारेगार जाला नाहीं. दुसरीयाने राजे याणी पटीयाचा वार खानावर टाकिला दोन भाग शरीर होऊन पुरा होउन खाले पडिला कृष्णाजी भास्करास म्हणो लागले, जे, ब्राम्हणास मारीत नाही पळोन जाणे कृष्णाजीपंती भोईयास हाका मारून खिजमतगार पाच

व भोई बत्तीस येऊन पालखींत मुडदा घालून जात असता सदरेमागे गारीत, संभाजी व काउजी बंदे जीवमाहाले वगैरे चाळीसजण धारकरी येऊन भोयान्च्या पया केल्या भोई व खिजमतगार जीवें मारिलें ते समई दत्ताजी गोपीनाथ हेजीव सापडले यास दार जाले लोकानी वोलखीले नाहीं. सिवाजी राजे याणी दत्ताजी-पतास रक्षिले व कृष्णाजी भास्कर यासही मारू दिधले नाहीं त्यास मार्ग दिधला. लष्करांत सागण्यास माघारा जीव घेऊन गेला.

## कलम ३५

त्याउपर पालखी समेत मुडदा खागाचा गडावर आणिला. तुळजापुरास उपद्रव श्रीभवानीस केला म्हणून ××× सेख लोखंडाची तावून सीर दरवाजीयावर बाधले, तोफा सुटल्या वाद्ये वाजली ते समई मावले जाऊन नाके रडतोंडी घाट धरून कुल फौजे बुडविली बारा हजार घोडे हत्ती दरोबस्त घेतले. वाईस जाऊन कुल लष्कर व बुणगे व तोफाखाना दरोबस्त गडावर नेल्या. फत्ते जाली. ते समईच खंडोजी खोपडा धरून जीवे मारीला मातुश्री जिजाऊस येऊन भेटले. दत्ताजी गोपीनाथ वोकील त्यास ईनाम मौजे हिवरे दिधले रोख दोन लक्ष बक्शीस केले. मुलास त्याच्या अद्याप अन्न आहे इनामगावीं सुखी आहेत शके १५७५ विकृती-नाम सवत्सरे. आबादुल्लाखान मारिला

## कलम ३६

त्याउपर तेसमईच येउन सातारा व चंदनवदन वगैरे गड व विशालगड व पनाला व कुलगड व पारगड व भीवगड सदरसोध असी गड घेऊन सीवाजी राजे पनालीयावर गेले. नेतोजी पालेकर सेनापती सरनोबत केले कान्हा मोर देउ गपजुप मजमदार केले पागा त्याच्या स्वाधीन केली पन्हाळा खुद राहिले.

## कलम ३७

याउपर फाजीलखान अबदुलखानचा लेक जखमीं होऊन फकीर होऊन विजापुरास गेला. पातशाहापासी जाउन डोईस टोपी घातली. जे, आपले बापाचा सूड घेणें त्याउपर पातशाहानी कुल सरदार त्यास ताकीद केली, जे, मोहीम सिवाजीवर करणें त्यावरून ऐसी हजार फौज कुल उमराव घेऊन फाजीलखान पन्हालायास येउन वेढा घातला.

## कलम २८

याउपर वेढियात सिवाजीराजे, साठ हजार मावळे, व नेताजी पाल्कर सरनौबत होते साहा महिने वेढा होता, खाले येऊन अंगे रात्री मोर्चा मारून वरते गडावर जात असेत कोणी येके दिवसी नेताजी पालकर याचा मेहूणा रात्री मोर्चा मारा-वयास गैरहजीर राहिला. हे वर्तमान राजे यास विदित जाले ते समई रागास येऊन गैरहजेरी जागा एक महिन्याचा करू लागले. ते समई नेताजी पालकर याणी सक्त रदबदली केली म्हणून राजे स्वामीनीं नेताजी पालेगार यजवर इतराज होऊन दूर केले लाडतोजी गुजर होते, त्याचे नांव प्रतापराव ठेऊन सरनौबत्ती दिधली, ऐसी नित्य भाडण होत असे. पावनगडीखालीं डोंगर होता त्यावर तोफा जोडून मार करू लागले. गोळे गडावर येऊं लागले ते समई हवालदार व लोकाणीं अर्ज केला, कीं साहेबी येथून जाणे म्हणजे वेढा उठोन जाईल. बाहिरून उपराळा होईल हे मसलत ऐकोन राजे तयार होऊन वीस हजार मावळे गडावर ठेउन चाळीस हजार मावळे बराबर घेऊन मोरचा रात्री मारून चालिले.

## कलम २९

त्याउपरी विशालगडच्या मार्गे पाई चालता चार कोसावर उरला तो प्रात.काल जाला फौज रातोरात चद्रज्योती लाऊन मार्ग काढीत फौज पाठीवर कुल लागली. ते समई बाजी प्रभू देश कुलकर्णी हीरडेस मावलकर धारकरी राजे यास म्हणो लागले, की तुम्ही निमे लोक घेऊन गडावर जाताच तोफाचे आवाज करणें. तों पावेतों या खिंडीमध्यें आपण निम्मे मावळे घेऊन दोन प्रहर पावेतों पाठीवर फौज येऊ देत नाहीं. साहीबी निघोन जाणे. आपण साहेब कामवर मरतो. पुढें मुले लेकरास अन्न देणें. असे म्हणोन बाजी परभू उभे राहून राजे यास वाटे लाविले तो फौज फाजीलखान व सुरज्याखान कुल सरदार येउन खिंडी संनिध भांडो लागले वीस हजार मावले बाजी परभू यानी बहुत युद्ध केलें. प्रहर दीड प्रहर पावेतों फौज खिंड चढो दिधली नाहीं. तों राजे गडावर जाऊन तोफ मोठी सोडली. आवाज दोन तीन करतां बाजी परभू म्हणो लागले जे याउपर जीव गेला तरी काहीं धोका नाहीं त्याउपर फौजेतून प्यादे कानडे मागून आले त्यानी मोड केला मावळे खिंडी-तून मारून काढीले, पळो लागले. ते समई बाजी परभू उभे राहून भांडण झालें.

बाजी परभूस जखमा जोरावर लागल्या त्या स्थळी पडले. पडता मावळे कांही मेले, कांहीं डोंगरात साभाळून पळाले. फौज गडाखाली गोणीमुठ तेथें प्रहर पावेतों उभे राहिले. त्या स्थली पाणी नाहीं. कोंकण कुबल जागा देखोन या उपर सिवाजी सापडत नाहीं येथें अगर पनाला राहिला. फौजेवर छापा घालून बुडविलें. हा विचार करून माघार फौज कुल घेऊन विजापुरास वेढा काढून गेले.

## कलम ४०

त्याउपर तधी पासून परभूवर मेहेरबान जाले त्याचे पुत्रास बाबाजी बाजी परभू जमिनीविस सेनापतीची वतनी धंदा सागितला गडावर कुल कारखानीसी वतन कुल परभूस जाले फत्ते जाली त्याउपरी राजे किले पुरंधरास आले शाम-राव नीलकंठ × × × शात जाले राजगडाचा इमारतीवर मोरो त्रिंबक पिंगळे होते त्यास पेशावाई चौकस पाहून सागितली

## कलम ४१

त्याउपरी तेच समई निळो सोनदेव मजमदार जाले. सोनाजीपंत याचे पुत्र त्रिंबक सोनदेव डबीर जाले. आपाजी दंतो सुरनिवीस जाले दत्ताजीपंत वाकनीस जाले. असे अष्टप्रधान केले. त्याउपरी दिल्लीची मोहिम औरंगशाहा तक्ती बसल्या उपरी दोनतीन वर्षे तिकडे बदोबस्तीस लागले तों इकडे शिवाजी राजे यांणी गड व फौज व बारा मावळे देखील चलाविले. राज्यो जोरावर जाले. हे वर्तमान दिल्लीस औरंगशाहास खबर जाली औरंगाबादेस रक्षण मोहोकमसिंग रजपूत होता. त्यास हुकूम जाला, जे शिवाजीवर मोहीम करणें त्यावरून मोहोकमसिंग रजपूत दहाहजार फौजनिसी नगर आलीकडे चालोन आला. त्यावर फौज प्रताप-गड गुजर सरनौबत वीस हजार फौज पाठविली युद्ध जाले मोहोकमसिंग रजपूत रणी पडला फौज कुल प्रथम बुडविली फत्ते जाली. दहाहजार घोडे घेतले.

## कलम ४२

त्याउपरी राजे राजगडास जाऊन लग्न केले. तिघी स्त्रीया केल्या त्यास्थळी राहून कोंकणातील किल्ले समुद्रातील बेटे होती ती बांधली. सुवर्णदुर्ग व कुलाबा व सिंधुदुर्ग व विजयदुर्ग किल्ले बांधून राजापुरी भोवताले कुलकिल्ले वगैरे करून

आरमार सजून दर्यासारग त्याचे स्वाधीन आरमारे केली. हपसी व फिरंगी इंग्रेज तमाम जेर केले. कोकण तमाम कल्याण भिवंडी पासून तहद बांदेजोड प्रांत गोवे सरद सीधे तळकोंकण काबीज केलें. तमाम ठाणी बसविली.

## कलम ४३

याउपरी औरंगशाहा याची मोहाकुमसिंग बुडाल्यावर शास्ताखान मामा खुद ऐशी हजार फौज त्याचे तैनातीस करून रजपूत जेसिंग मीरजाराजा तमाम बवीशी सुभा कुल येकतारी देउन दक्षिणे मोहीम सिवाजीवर केली प्रथम वेढा चाकणेवर येऊन खुदानी नव महिने बसोन मोरचे मनताले बसले. फिरंगोजी नरसाला हवालदार बहुत भांडला इशानकोनचा बुरुज सुरुंग लावून उडविला. त्यापरी किला जेर जाला. किला घेऊन फिरंगोजी नरसाला शास्ताखानास भेटला. मनसफत देत होता कबूल केले नाहीं राजेस्वामीस येऊन भेटला. राजेस्वामींनी नवे जुने कीले भुपालगीचा हवाला फिरंगोजी नरसालीयास सांगितला. बाबाजीराम होनाप देशपांडीये पुणेकर आगोधर पुढें बऱ्हाणपुरा जील्हा भेटिला होता त्याजउपर संभाजी काउजी बंदा त्याजवर इतराजी जाली परिखा होउन शास्ताखानास भेटला. जोरावर होता. घोडा चीपाई धरून उचलिला. त्याजवरून मेहेरबान जाले मनसफन जाले. मौजे मलकर तेथें गाव बलकट करून तेथें पाहून पाचशे स्वारानिशी होता. त्याउपरी राजेस्वामिनी फौज पाठवून टाणे मारून संभाजी काउजी बंदा युद्ध करिता पडला. त्याउपर शास्ताखान चाकण घेऊन छावणीस बायकापुत्रासह वर्तमान कसबे पुणें येथें लाल माहाल राजेस्वामीचा तेथें येउन फौजेसहवर्तमान राहिला बाबाजीराम यास मनसफ होती मेहेरबान त्याजवर होती. शके १५७९ मन्मथनाम सवत्सरे वैशाख वद्य १० इदुवासर मौजे मलकरी नेताजी पालेकरी सर नौबत फौजसह वर्तमान येउन संभाजी काउजी मारिला. व गाव जाळीला. तधीपासून गाव खराब आसे

## कलम ४४

या उपरी शास्ताखान सिवाजी राजे त्यास पत्र पंडितास बसऊन लिहीले होते सिलोक लेहून पाठविले.

वानरस्त्वं वनेवासी पर्वतास्ते सदाश्रया ।
वज्रपाणिरह साक्षात् शास्ताखान उपागत. ॥

## कलम ४९

यांचे प्रत्योतर राजे स्वामीने पाठविले.

पराजिग्ये वज्रपाणिं शिवोयो लंकानाथं वानरः श्री हनूमान् ।
तयोराघवद्वर्णशाल्मे नृपोह शीघ्रं शास्ताखान जेतालयेय ॥

थाउपर सिवाजीराजे राजगडाहून कुल मावळे जमा करून माळी पुणेकर फुलहार नित्य शास्ताखानास देत होता. त्याचा मेव्हणा राजापाशीं होता त्याचें हते भेद केला. त्यास पाचसे होन देऊ केले. लालमाहाल तेथें खिडकी होती बागेमध्यें जावयाची. त्या स्थळीं घर माळयाचे होते. राजगडीहून चाळीस हजार मावळे व पांच हजार फौज उत्तररात्री आंबिलआवल तेथें स्वार घोडी ठेऊन आंबराईतून पायी मावळे जागा जागा ठेऊन माळी समागमे घेऊन खिडकी समीप खुद राजे आले भाद्रपदमास, पावसला, कालोखी रात्र, ते समई गावकुसु खिडकी उघडून लाल महालात गेले. चौकीस खोजा हीलाल देउन पचवीस माणसें घेऊन चौकीस जागत होता. पांच हजार मावले धारकरी घेऊन खोजा मारिला. माणसें मारिली. तेच माहालात खोली पुत्राची माळ्यानें दाखविली शास्ता खानाचा जेष्ठ पुत्र निद्रीत ज्वान स्त्रीसहवर्तमान होता. तेथें जाऊन पुत्रास एक्याच घाई पळ्याचे पलंगावर खुद राजियानें मारून, सहलीस एक चाबुकानीं मारताच तिने सांगितलें जे खानाचा पुत्र रात्रीं माळयानें चुकून खोली पुत्राची दाखविली. त्याच सेजारीं खोलीमध्यें शास्ताखान धुंद होता. तिकडे राजे जाताच शास्ताखान सावध होऊन शारसुबीची भिंत उडोन गेले. सिताबी करून वार केला अंगठा उडोन पडला तेच खबरदारी चहुकडे जाली वादाने आवाज चहुकडे आले. तेच राजे फिरले थोरला दरवाजा तिकडे हत्तीवर चद्रजोती लाउन तयार जाले मावले लोकानी सोंडा हत्तीच्या तोडून खीडकी बाहेर निघाले. घोडीयावर स्वार होऊन रातोरात माघारे राजगडास प्रात काल होताच दाखल जाले. तोफा तयार केल्या.

## कलम ४७

याउपर तेच रात्री लष्करसह वर्तमान हिलाल लाऊन पावसामध्यें शास्ताखान पुत्राचे शोकास्तव पाठलाग करून रायगडाखाली फौज घेऊन येउन उभे राहिला. तो अबारीस गोळा लागोन अबारी उडाली हत्ती मागी स्वार त्यास गोला लागला. शास्ताखान याणी जागा कुबल पाहिली. मुकाम करावा तरी पाऊस फार. डोंगर भवताले. सिवाजी आपणास मारील. फौज घेउन पुणीयास दाखल माघारे जाले.

## कलम ४८

त्याउपर पाऊसाला जाला, कार्तिक मासी मागती गडावर मोहीम करावी तो दिल्लीस पातशहास खबरवाले दाखल जाले जे, सिवाजींनी छापा शास्ताखानावर घातला पुत्र मारिला, अगठा तोडिला. त्याजवरून इतराजे होउन सुभा तगीर होऊन सुभा तगीर केला. हुजूर बोलाविले. मिर्जाराजा त्यास सुभा जाला. वस्त्रे सिरपाव जाला सनद जाली. तेनातेस दिल्हे. दीलेलखान जाले.

## कलम ४९

त्याउपरी मिरजाराजा किले कोंढाणा सिंहगडास वेढा घातला. राजे राजगडाहून उपरान्न मावळे पाठवून मोरचे रात्रीस यऊन मारीत आसते जेकीरा जो पाहिजे तो पाठवीत आसत त्याउपर प्रतापराव गुजर सर नौबत यासी करार करून मुलामाणसाचे चालवावे शफत करून लष्करात मिरजा राजे याचे पाठविले शिपाईचा धड बेरोजगारी होती. कटारी मजुरीयास नित्य जाता कोणे एके दिवसी सधी पाहून संध्याकाळीं मजुरा होऊन महालात जाता कोणासी पाहून प्रतापराव यांणी कटारी काढून मिरजा राजा त्यास मारावे. आपन मरावे. निदान कबूल केलें. संन्निध येतांच सेवक कोणी देखिले तेन्हा धरून मार बहुत दिधला ते समई कबूल जाले जे सिवाजी राजे याणी तुम्हास मारावे, आपन मरावे. उदार जीव करून लस्करात आलों आमचे हाते तुम्हास मृत्यु नन्हता, हे उत्तर दिल्हे. त्यावरून मिरजा राजा मेहेरबान जाले, सीरपाव उत्तम व घोडा उत्तम देऊन प्रतापराव गुजर त्यास सोडले. रायगडास राजेस्वामीस येऊन भेटले कृपाळीं जाले बक्षीस सीरपाव दिधला. समाधान पावले.

## कलम ५०

त्याउपर सिवजी राजे याणी किला पुरंधरास येऊन पेडगावी येऊन रसद व लमाण वगैरे रहदारी येत होती ते मारिली. हे वर्तमान मिरज्या राजा त्यास विदीत जाले सिंव्हगडाचा वेडा काढून किले पुरंधरास येऊन दिले–खान पठाण दरोबस्त येऊन बसले रुद्रमाल खालीं डोंगर होता त्यावरी धमधमे रचून तोफा गडावर गोळे येत आसेत मोरचे नारायण पेठेकडून चालीले. खालते येऊन मोर्चे मारून जात केदार दरवाजीयाकडून जकिरा व लोक साठी हजार मावळे व सिवाजी राजे खुद निलय भांडत त्याउपर मिरजा राजा याणें हेजीब पाठवून भेटीचा मार माडिला. सिवजी राजे यानेहि चित्तात आणून भेटीचा तह केला गडाखालीं येऊन मावले समागमें घेऊन भेट घेतली मिरजा राजानें सामोर येऊन भेट जाली हत्ती घोडे सीरपाव जाम आलकार उत्तम देऊन वचन प्रमाण जाले. पातशाहाचे भेटीस दिल्लीस आवे मिरजा राजा त्याचा पुत्र रामसिंगास समागमें द्यावें सिवजी राजे व संभाजी राजे उभयता दिल्लीस जावे असा तह जाला.

## कलम ५१

ते उपरी रायगडी जिजाऊ व राजाराम त्यापासी मोरोपंत पेशवे व निलो सोनदेव मुजुमदार व आनाजी दत्तो सुरसवीस व सरदार व पागा ठेऊन निर्वणुक करून दिल्लीस चालिले. पाच हजार पागा व प्रतापराव गुजर सरनौबत व निराजी राउजी हेजीब त्रिंबकपत डबीर, रघुनाथपंत कोरडे व हिरोजी फर्जंद व मावले पांच हजार इतका समुदाव घेऊन दिल्लीला समागमे मिरजा राजा त्याचा लेक रामसिंग हजार स्वारानिसी समागमे होते. मजल दरमजल चालिले मिरजा राजा औरंगाबादेस गेले.

## कलम ५२

त्या उपर भेटीस उभयता सिवाजी राजे संभाजी राजे व मुत्छदी घेऊन भेटीस पातशाहाचे गेले अगोदर रामसिंगानें व निराजीपती मजुऱ्याची राहारवेश उभें राहून करावा हे पढविले होते, भेटीस तक्तापुढें सनिध जाताच सलाम न करता राहीमखान दिवान त्याचे वरते जाऊन पिते व पुत्र उभयतां उभे राहिले. खुनेनें

रामसिंगानें सांगितलें परंतु सलाम न करता मनामध्यें तुरकास सलाम करणें उचीत नाही पातशाहानी सिवाजीस पाहून रुमाल तोंडास लाऊन हसो लागले, रामसिंगाकडे पाहिले रामसिंगानें समजाऊन सांगितले, जे मन्हाठे यास राहार वेश ठाऊकी नाहीं तेंच क्षणीं रामसिंगास आज्ञा केली, जे घेऊन उभयतास जाणें. जाते समई मजुरा केला नाहीं पाठी पातशाकडे करून चालिले. लस्करांत आपल्या डेऱ्यांत आले

## कलम ५३

त्याउपरी दुसरे दिवशीं रामसिंग यास बोलाऊन पातशाहानें पुसिले कीं तुम्ही जाऊन सिवजीस पुसणे जामीन देणें, मनसफु देउ, नाहीं तर पुत्रास येथें ठेवावे. त्यास आज्ञा देऊन त्यास रामसिंगानें उत्तर दिधले, जे, त्यास पुसोन उत्तर देऊ त्याउपर रामसिंग सिवजीकडे येऊन विचार पुसिला. रामसिंग म्हणो लागले, जे, आपण जामीन तुम्हास होत नाहीं. राजे त्यानींही सांगितलें, जे, तुम्ही जामीन न होणें आम्ही पुत्रास ठेवीत नाहीं. उभयतां येथें राहतो ऐसे उत्तर दिधले. याचा विचार मनास आणून पातशाहास जाहीर केला पातशाहानें हुकूम केला, जे उत्तम, हावेली किल्यासमीप पाहून देणें. येथें येऊन राहातील. हुकूम होतांच उभयता मुत्सदी दरोबस्त शाहरात जाउन राहिले. तेच समई चौकीदार दाहा हाजार तोफाची हजारी येउन पातशाही तोफखाना येऊन चौकी बसली सिवाजी राजे याणी रामसिंग यास आणून फजित केले. इमानी रजपूत. इमान तुमचे आमचे जाले ते उजवले जे जाले ते बरेच उत्तम आले. पातशाहास आर्ज तुम्हीं करून प्रतापराव गुजर व पागा व मावळे लोक वगैरे देशास जातील. पातशाही दस्तक वाटेनें करून देणे आम्ही उभयता पातशाही कैदेंत आहों वरकडास जाऊन देणे आम्ही उभयता आहो. त्यावरून आर्ज पातशाहास रामसिंगानें केला दस्तक करून दिले. प्रतापराव गुजर व पागा व मावळे वगैरे लोक देशास वाटेस लाविले. दोन पालख्या, दोन घोडे उत्तम व खिजमतगार व निराजीपत व त्रिंबकपंत व रघुनाथपंत कोरडे व हिराजी फर्जंद इतके राहिले. वरकड कुल वाटे लाविले.

### कलम ५४

त्याउपर पातशाहाची भेटी नाहीं कैदेंत होते परंतु इज्जतीनें होते नित्य मेवे झाल्या, काहूर पाठवून समागमे निराजीपंत व रोहिलाखान वगैरे मुछदी कुल त्यास मेवा पाठवीत होते त्याकडूनही मेवा येत आसेत. ऐसी निख खुशामती माडली. एक दोन वेळ झाडा घेतला मग झाडा घेणें राहिले. ऐसे दोन मास झाल्या नित्य येऊं लागल्या. तों कोणे एके दिवसी चार घटिका दिवस असता उभयता पिते व पुत्र डालांत बसून दिल्लीशाहर कुंभार देशीचा इमानी होता ×× अगोदर हिरोजी फरजंद जाऊन इमान त्याचे घेतलें होतें. त्या स्थळीं जाऊन उभयता परसांत मोठी हवेली त्याची होती तेथें गुप्त राहिले इकडे मागें उभयता जातेसमई हिरोजी फर्जंद पलंगावर चिरा व तुरा मोत्याच्या घालून निद्रा केली झरोखा त्यावाटे राखणदार पाहात असत. त्याउपरी दोन घटिका जाली उपर सध्याकाळ समय हिरोजीनें चिरा व तुरा पलंगावर ठेवून बाहेर निघाले निराजीपंत अगोदर सावध होते हिरोजी ×× दिसेनासा जाला. ते समई राखणदार पाहो लागले तो पलंगावर चिरा व तुरा राहिला होता हाक जाली पातशाहास खबर जाली चौकीदारास मार कैद जाली. त्र्यंबकपंत डबीर व रघुनाथपंत कोरडे याचें बिराड वेगळे होतें. उभयता मात्र सांपडले त्यास मात्र केदेंत ठावल. वरकड अवघे गेले.

### कलम ५५

त्याउपर कुभाराचे घरीं एक मास गुप्त होते. चहूकडे वाटेनें दौंड फौजा गेल्या. कोठें वाटेस शुद्धी नाही. शाहरांत दौंडाही पिटली. फौजा माघाऱ्या आल्या. शांत जाले त्याउपरी दाढ्या बोडून बैरागी वेश घेतला निराजीपतास बैरागी भाषा येत होती. त्यांस महतपण देऊन सर्व मडली बाहेर उत्तर मानस, वाराणसी, व प्रयाग, व गया सर्व यात्रा करून देवगडाच्या मार्गे चापे प्रांताहून गंगा इंदूर प्रांती उतरून कडेवळप्रांतात आले, तो अगोधर फौज आनंदराव व तेलगराव त्याची फौज येऊन गुरे तमाम त्या गांवची नेली होती. त्याच गावी हे झुंड गावांत गेली एक पाटलीन, तिचे घरास जाता जाला तीस म्हणो लागले, जे, बाई स्थळ घाल तर राहूं. ते म्हणो लागली जे, गोठा खालीं पडला. सिवाजीच्या स्वारानीं गुरें तमाम नेली सिवाजी

केदेंत दिल्लीस पडला होता तैसीच पडो. नाना प्रकारें सिव्या देऊ लागली. निराजीपंताकडे पाहून हसो लागले. तिचे नांव गाव लिहून घेतले. त्या उपरी त्याच वेषें भीमा उतरून स्वराज्यात आले. याच वेषें येऊन रायगडास दरवाजीयास दाखल झालें. जिजाऊस खबर केली, जे बैरागी झुंड उत्तरेकहून आली आहे. हे वर्तमान ऐकताच परवानगी झाली. जिजाऊचे दर्शनास बैरागी वेषें गेले निराजीपंती आशिर्वाद केला सिवजी राजे याणी मातुश्रीस जाऊन पाई डोई ठेवली. मातुश्रीनें वोलखिले नाहींत. राजे जाऊन माडीवर बसले. डोईची टोपी काढाडली. तेव्हां वोलखिले ते समई आनंद जाला. वस्त्रे भूषणें डोईचे टेक पाहून दिधली. धर्म केला. तोफा वाद्ये जाली. समाधान सर्वांस जाले.

## कलम ५६.

त्या उपर संभाजी राजे श्रीकाशीमध्यें नानाजी विश्वासराव ब्राह्मण थोर होते त्याचे घरी ठेविले होते. वाटेस चालवेना म्हणोन ठेविले होते. दुसरे वेळेस पोहा आला ते समई येऊन रायगडास आले. त्यास बकसीस नानाजी विश्वासराव, त्यास दिधले दोन लाख देऊन आनद जाला. जिजाउ उपवास करीत होती. त्याउपर पारणें केले धर्म बहूत केला.

## कलम ५७.

त्या उपर डबीर त्र्यंबकपंत व रघुनाथपंत कोरडे त्यास केदेंत होती. ते दिल्लीस पातशाहनी सिरेपाव देऊन सोडले. तेही मागाहून आले. राजे स्वामीनीं प्रतापराव यास व निराजीपत व त्र्यंबकपंत व रघुनाथपत कोरडे व हिरोजी फर्जंद त्यास बकसीस बहूत दिधली.

## कलम ५८.

त्या उपरी मिरजाराजा त्याजवर पातशाहा इतराज जाले, जे सिवाजीस पळविले. हा अन्याय ठेऊन सुभा तगीर केला. हुजूर बोलविले. मिरजा हुजूर गेले. दलेल खानास सुभा दक्षणेचा जाला. त्याणी पेडगावी भीमातीरी येऊन राहिलें.

## कलम ५९.

त्या उपर संभाजी राजे त्याजवर इतराज जाले. श्रीघारपुरी ठेविले. पढवायास उमाजीपंत ठेविले होते तैनाती मावले व स्वार होते. दलेलखानाकडे राजकारण

करून कौल आणून रातोरात स्त्रीसह वर्तमान निघोन पेडगावास गेले. दलेलखान सामोरे येऊन लष्करांत घेऊन गेले. आदर बहुत केला डेरे व लोक तीन हजार पठाण तैनात करून लस्कर कुल घेऊन किले भूपालगडास गेले गड बलें घेतला कोणी भांडले नाहींत. फिरगोंजी नरसाला हवालदार व विठल भालेराव सबनीवीस पलालें वरकड गडकरी सांपडले. त्याचे हात व कान घेतले. राजे पन्हाळावर होते. फिरगोजी नरसाला भेटीस येता गड दीधला म्हणून तोफेंत देऊन उडविला विठल भालेराव यास बहुत मार दिघला ब्राह्मण म्हणून सोडिले. राज्यातून बाहेर घातले. कुल तमाम गड खबरदार जाले कुल थाम पडला. दलालखान विचारी पडला. विजापुराकडे गेला तेथून भागानगर प्रांतास गेले

### कलम ६०

त्याउपर संभाजीराजे भेटले जे वर्तमान पातशहास वाके दाखल जाले. दिलेलखानाकडे लिहून पाठविले होते. त्याजवरून हुजराची तलब आबादी आले. जे संभाजी राजे त्याज बराबर फौज देऊन बलकटीनें हुजूर पाठवावे. इतवा येताच संभाजी राजे याजबरोबर फौज देऊन रातोरात स्त्रीसहवर्तमान पलविले पठाण इमानी त्याणी इमान राखिलें त्याजवर संभाजीराजे किले पनालीस आले. राजे समोर येऊन बहूत आदरे करून घेऊन गेले. किले पन्हाला संभाजी ठेऊन राजे राजगडास गेले दिलेलखान तेच समई मलीखेड तेथें गेला. भागानगरची फौज मादणा येऊन बहूत भांडण जाले दलेलखान जेर जाला माघारा कष्टी होऊन गेला विजापूर येथील फौज होती त्याउपरी सला केला.

### कलम ६१

त्या उपर पातशाहास जाहीर जाले जे संभाजी राजे यास पलविले त्याबद्दल येनराज होउन प्याला घेउन आह्लादी आले. प्याला देउन दिलेलखान या सारिखा मोहरा मारिला.

### कलम ६२

त्या उप्पर दक्षिणेस सुभा शाहा आलम वडील पुत्र शाहाजादा कुल येकत्यारी त्याचे तैनाती राजकर्ण व भावसिंग व जेसिंग कुल तैनाती जाले. आवरंगाबादेस

दाखल जाले. राजगड माहुलीस निराजी राहूजी वकील त्याचे समागमे हुजुरचे कारकून मजमुचे तर्फेनें आनाजी रंगनाथ मलीकर व येसाजी मल्हार वाईकर सुरूणीचे तर्फे जे समागमे उभयता कारकून लिहीणार दिधले,व प्रतापराव गुजर सरनौबत पांच हजार फौज हत्ती दोन देऊन प्रतिष्टेनें औरंगाबादेस पाठविले. सत्तावीस किले पुरधर व त्रिंबक वगैरे किले देऊन सला जाला. राजेस्वामीस जहागीर वालापूर व श्रीअवढे वगैरे महाल प्रांत वराड जाहागीर दरोबस्त दिधली सला तीन वर्षे चालिला, मागती बिघाड जाला. निराजीपंत व प्रतापराव गुजर हजूर रायगडास आले. सत्तावीस किले पुरधर व त्रिंबक वगैरे किले मागती घेतले. मोरोपंत पेशवे व केसो त्रिमल यानी माळाकडून किले घेतले मोरोपत पेशवे किले सालेर तेथें होते. बागलाण काबिलला करून होते.

## कलम ६३

त्या उपरी सिवाजी राजे खुद फौज घेऊन जाऊन सुरतेचा पुरा लुटिला. येकदर लुटिलें. मत्ता बहूत सापडली दिलीस पातशाहास पत्र पाठविलें. जे, तुमचा मामा शास्ताखान त्यास शास्त केली, तुमची सुरत होती ते बेसुरत केली पातशाही पुरातन हिंदूची आहे दक्षण तक्त दौलताबाद निजामशा पातशाहाचे. आम्ही वजीर कदीम निजामशाही तुमचें दाक्षिणेस कांही नाहीं. पातशाही दिलीची तुमची नव्हे. पुरातन हिंदूची आसे. पत्र लिहून पाठविले त्याचे उत्तर फिरून दिलीहून आलें नाहीं.

## कलम ६४

त्याउपर दाक्षिणेस सिव्या नाईक व बिदनूरकर पालेगार होते. त्यास पत्र लिहीलें जें आम्हास नालबंदी व फुर्स देत जाणे व किले आम्हाकडे पाठविणें ते राज्य पुरातन जबरदस्त त्याणी उत्तर पाठविले, जे बल होईल तर नालबदी घेणें हे उत्तर येताच राजे स्वामिनी मुहूर्त पाहून रायगडहून मोहिमेस चालिले. जाते समई पालखी सिद्ध करून स्वार जाले ते समई राजाराम त्याची मातुश्रीस ऋतु प्राप्त जाला. हे खबर माहलातून आली परंतु न जाता नये. समागमें पालखी स्त्रीची घेतली किले मालवण, सिंद्धदुर्ग पावेतों पालखी स्त्रीची होती ऋतु देऊन

स्त्रीस माघारे रवाना रायगडास केले तोंच गर्भ राहिला. राजाराम त्याचा जन्म-काल जाला.

## कलम ६५

त्याउपरी सिंदेदुर्गी तमाम आरमारें जहाजे आणून मावले जमाव घेऊन जाहजात बसून पेठ हुसनुर प्रांत गोकर्ण समुद्र तीर बंदर मोठे बिदनुरकराचे होते, ते मारिले बहुत मत्ता द्रव्य सांपडले साहुकार धरून मत्ता घेऊन रायगडास कार्य-सिद्धी करून आले. सिवाप्पा नाईक त्यास धाक निर्माण जाला वकील पाठवून राजे स्वामीस भेटून तह वर्षास तीन लक्ष होन द्यावे असा तह जाला. उमा पंडीत त्या स्थलीं हेजीब नेहमीं ठेविला. सिवाप्पा नाईकाचा स्नेह त्या दिवसा-पासून जाला.

## कलम ६६

त्याउपरी कर्णाटकांत शाहाजी राजे होते त्याचे तैनाती बाजी घोरपडे मुधुलकर सात कोस विजापूर पातशाहाचे चाकर मल्यादार पांच हजार फौजेनिशीं माहाराजे साहेब त्याचे तैनातीस होते. सिवाजी राजे याणी आबदुलखान मारिला. तमाम गड घेतले. राज्य बलकट जाले. कांहीं इलाज नाहीं बाजी घोरपडे, त्यास येकांतीं कपट सांगोन पातशाहानीं रवाना घोरपडे यास केले होते. त्याउपरी शाहाजी राजे किले तीरवादी नजीक चंदी त्या स्थली लष्कर सडी फौजेनिसी होते. येकोजी राजे व व कबीला चंदाबरी होता. घोरपडे याणी मेहमानीस शाहाजी राजे आणून विश्वास बहूत दाखवून कैद केलें.

कुल लष्कर घोडे हत्ती व मत्ता जप्त केली. हें वर्तमान सत्वर विजापुरास पात-शाहास लेहून पाठविले. ते समई पातशाहा खुश बहूत जाहले. सत्वर जिलेबदार एकाती बोलाऊन परवाना घोरपडे यास पाठविले, जे, पत्र देखन गार खाणून शाहाजीस गारीत घालून चीप गल्ल्यापासी देऊन धोंडी मोठी डोईवर देऊन बुजून जमीनीमध्यें टाकणें हे हकीकत लेहून जीलेबदार रवाना केला.

## कलम ६७

या उपरी हे वर्तमान रणदुल्लाखान वजीर वीस हजार फौजेचे सरदार थोर होते. त्याचा व शाहाजी राजे याचा भाऊपणा होता त्यास जाहीर होतांच कागदी सुगडी करून चिवटी हातीं घेऊन पातशाहाचे मजुरीयास गेले. पातशाहास म्हणो लागले; जे आपण मक्केस जातो. कुल वजीर सरजेखान देखील एक जाले पातशाहा बहूत घाबरे झाले. पातशाहीस दगा पोहोचेल. हे जाणून रणदुल्लाखान यास हाती धरून बसविला. पातशाहाचे आभय घेऊन मुद्दा जाहीर केला, जे सिवाजीचे रागें शाहाजीस कैद करून मारावे, बाप करी बाप पावे. बेटा करी बेटा पावे, कुराणी लिहिलें आहे हे सक्त रदबदली केली. पातशाहा खुश करून बोलिले, जे शाहाजीस भेटीस हुजूर घेऊन येणे. जामीन तुम्ही होणे. भेटून सवेच जातील. रणदुल्लाखानानें कबूल केले. जामीन जाले. परवाना सोडायाचा घोरपडे यास ताकीद लिहिली जे, सोडून याची वस्तभाव घोडे हत्ती देऊन सन्मानें घेऊन हजीर येणें. हा परवाना तयार केला जीलेबदार आपला खुद इतबारी रणदुल्लाखाना रवाना केला. जीलेबदारास ताकीद केली, जे, पातशाही जीलेबदार पोंचला नाहीं तो जाऊन शाहाजीस सोडून हुजूर आले म्हणजे तुजला इनाम मणभर सोनें देऊ. असा जिलेबदार सिताब रवाना केला.

## कलम ६८

त्याउपरी पुढें पातशाही परवाना घोरपडे यास जाताच शाहाजी राजे त्यास अभ्यंग करून भोजन उत्तम करून लष्कराबाहेर गार खाणून गारीत बसविलें. अंतःकाल समई गीतापठण केलें. त्याउपरी हानवटीस चीप लाउन मोठी धोंडी डोईवर ठेवावी, माती घालून बुजवून टाकावें, तों मागाउन जीलीबदार परवाना घेऊन आला. पातशाही द्वाही देऊन शाहाजी राजे त्यास गारीतून काहाडिले. वस्त्रें देऊन वस्तभाव घोडे हातीं देऊन सन्मानें घोरपडे घेऊन विजापुरास आले पुढें सामोरे रणदुल्लाखान वगैरे वजीर जाउन पातशाहाची भेट जाली. पातशाहा खुश जाले. वस्त्रें हत्ती घोडे व सदर बकसीस केली. तेच समई पातशाहाची आज्ञा घेऊन रणदुल्लाखान घेऊन बाहीर आले. समस्त वजीरानी मेहमानी केली पंधरा रोज विजापुरी होते त्याउपर कर्नाटकांत चंदावर प्रांताकडे गेले. मोहिमेस यावें हा

करार केला. रणदुल्लाखानानें येकातीं सागितलें; जे, घोरपडे वगैरे यास पातेजून प्रांत विजापुरास न येणें, पाचीगाववरून सलाम करणें माहाराज कोल्हापूर व बाळापूर प्रांतीं होते. रणदुल्लाखानाचे गुमट रहीमतपुरी आहेत व झाडें व विहिर अद्याप आहेत.

### कलम ६९

त्याउपर माहाराज राजे श्री सिवाजी राजे यांस सांगून पाठविले जे बाजी घोरपडे यांचे परिपत्य करणें. त्याचे स्थल मुधानें मारणें आमचे पुत्र असाल तर देखत पत्र कारण करावे. त्यावरून सिवाजी राजे किले पन्हाळा यास येऊन फौज घेऊन मुधाने मारिले. बाजी घोरपडा जीवें मारिला तीन हजार माणूस घोरपडे याचे नसन कापून काढिले. आकूजी पुत्र बाजी घोरपडे त्याचा आजुळास गेला होता तो वाचला. गंर्भ दरोबस्त कापिले सूड घेऊन किले पन्हालीयास आले.

### कलम ७०

त्या उपरी शाहाजी राजे माहाराजे, घोरपडे मारीला हें वर्तमान आईकताच खुशाल जाहाले विजईपुत्र त्याची भेट घ्यावी हा विचार करून फौजे सहवर्तमान देशास आले. पुण्यासनिध सिवाजी राजे याणी सेना कुल जमा करून पुढे सामोरे भेटीस गेले. हातीवर माहाराज देखतांच घोड्याखाले उतरून मजुरा करीत पुढें भेटीस गेले. माहाराज खाले उतरून भेटीचा विचार जाहाला. येक प्रहर आनंदाश्रु पुर लोटला. माहाराज पालखीत बसोन चालिले पुत्रास बसावयाचा पालखीत आग्रह केला. परतु सिवाजी राजेश्री याणीं ऐकिले नाहीं. पालखी समागमें पाई चालत पांच कोश पुण्यास दाखल जाले. माहालात गेले. जिजाउसी भेटी ते समई जाली. भोजन वस्त्रें परस्परे जाली. आनद जाहाला त्या उपर बाहीर सदरेस येऊन बसले. ते समई सिवाजी राजे याणीं खिजमतगार त्या पासोन बळें पादरक्षा घेऊन हुदेकरी त्यामध्यें उभे राहिले. तों रघुनाथ नारायण हणमंते त्यांणी देखिलें त्याणी माहाराज शाहाजी राजे त्यास श्रुत केले. मागे फिरून पाहिले. सिवाजी राजे यास हाती धरून बले संनिध बसविले दोन मास माहाराज होते. सिवापुर सेडे बरें पाहून श्री जेजुरी श्री माहादेव यात्रा करून कर्णाटकात गेले.

## कलम ७१

त्याउपर रणमस्तखान च्याकण नजीक कोल्हपुर प्रांती आला. प्रतापराव गुजर सेनापती फौजेनिसी युद्धास गेले युद्ध जाहाले गोळा लागोन प्रतापराव गुजर पडले. त्याउपर रायगडी बहिरराव मोहिते त्यास शेनापती जाले. कान्हो मोरदेव गपचुप यास मजमु शेनापतीची होती, ते दूर करून आनाजी रंगनाथ मलेकर यासी किले पुरधर तेथील सबनविसी दुसरीयाणे पुरधर घेतला ते समई सबनीविसी सागितली होती. त्याउपर राजे स्वामी कृपाळु होउन रायगडाचा मुकामी शेनापतीची मजमु अनाजी रंगनाथ मळेकर त्यास जाली. बयाजी फर्जंद, कारभारी बाबाजी बाजी परभु जमीनीवीस होते. दसऱ्याचे मुहुर्ते मजमु सागितली होती

## कलम ७२

त्याउपर शाहाजी राजे माहाराज व रणदुल्लाखान व सरजाखान वगैरे उमराव प्रात बिदनूर त्या प्रांती मोहीम जाली. मुकाम लष्कर मौजे बेदीकीर तुंगभद्रातीर प्रांत बसवापटण तेथें सिकारीस जाता ससा निघाला. त्याचें पाठी माहाराज घोडीवर होते. भाला घेऊन समस्त सरदारादेखतां ससा मारावयास निघाले. तो घोडीचा पाय आडवा पडला घोडी मुरकंडोन पडली. शाहाजी राजे खाली पडले. घोडीचा पाय सुताडीत पडोन शांत जाले त्या स्थली गुमट माहाराज त्याची आहे मौजे बेदीकीर गाव इनाम दिवाबत्तीस पातशाहानी दिधला. माहाराज शाहाजी राजे त्यांचा मृत्यु याप्रकारे जाला.

## कलम ७३

त्या उपरी विजापुरची पुरा दौलतपुर मारिले. भोवताला आवर्त बहुत माडिला हमेशा फौज भोवताली फिरो लागली. त्याजवरून विजापुरच्या पातशाहानी नाल-बंदी सात लक्ष होन पाठवून देवू केले रामजी नाईक पुंडे वकीलीस नेहमी विजा-पुरी ठेविले. सला जाला

## कलम ७४

त्या उपर भागानगरचा मुलूक तोही जेर केला तानशाहा व मादणा दिवाण त्यांनी ही वकील मदनाथपंत पाठवून तह केला नवलक्ष होन वर्षास थावे, नालबंदी घ्यावी. निराजी रावजी हेजीब नेहमी ठेविले. निराजीपंतास तेथे मृत्यु जाला. त्या उपर प्रल्हाद निराजी वकीलीस होते.

## कलम ७५

त्या उपर येकाजी राजे चंदावरी राज्य करीत असतां रघुनाथ नारायण हुणमंते मुजुमदार माहाराज शाहजी राजे त्याचे समई कुल मुखत्यारी होते. त्या उपर येकाजी राजे खुद कारभार करू लागले. रघुनाथपंतास पुरेनासे जाले त्याजवरून रघुनाथपंत श्री माहायात्रेस जाऊ असी आज्ञा मागितली. तेच क्षणी आज्ञा दिधली. जे, जनार्दनपंत बधु स्त्रियासहवर्तमान पाचसे स्वार व हत्ती कुल समुदायनिसी विजापुरास आले. पातशाहाची भेटी घेतली पातशाहानी बहूत आदर केला. वजिरी यावी असा विचार जाला हे वर्तमान सिवाजी राजे पनाली होते त्यास विदित जाहले. त्याणी पत्र रघुनाथपंतास पाठविले, जे, आम्ही आसतां तुरकाची सेवा करणे उचीत नाई. समाधाने पत्र येताच पातशाहाची आज्ञा घेऊन किले पन्हालेयास आले. राजे सामोरे जाऊन रघुनाथपंतास गडावर आणिले. राजे रायेगडास येऊन मजमु रघुनाथ नारायण यास सांगितली. ते समई निळो सोनदेव मजुमदार शांत जाहाले. त्यानतर रघुनाथपंतास मजमु जाली.

## कलम ७६

त्याउपर रघुनाथ नारायण रुसून येकोजी राजे त्याजपासी आले. याजबद्दल राजे स्वामीस येकाती समजाउन सांगितले, जे चंदावरचे राज्य बापरोटी आहे. निमे राज्यामध्ये वाटा धर्म न्याय तुम्हास आहे. बुद्धिवाद सांगोन कर्णाटकात जावोन येकोजी राजे त्यास भेटून निमे राज्य जोरावरीने घेऊन तमाम किले वाटणी घ्यावी. हा तह आला याचा निश्चय केला संभाजी राजे व राजाराम त्यासनिध मोरोपंत पेशवे व अनाजी दत्तो सुरनीस व फौज व मावळे ठेऊन बंदोबस्ती करून दक्षिण प्रांती चालिले.

५ - ८०१



## कलम ७७

त्याउपर चालिस हजार पागा मावले चालिस हजार समागमे, व बहिर-राव मोहिते सेनापती असे स्वार होऊन जाता कनकगिरी पाले तेथें सेनापतीनें सिंगी ( घोडी ) वटेस आरब्याचे ( नसन ) पाटलापासोन एक्यागावी घेतली. खरेदी केली होती. चैत्र मासी पाऊस वलीव बहूत पडिला. त्याबद्दल सिंगी हेन्याच्या सोडबोती ( सभोवतीं ) नेथें निवारीयास बांधिली हे वर्तमान राजे स्वामींस विदीत झाले. तेच समई बहिरराव मजूमदार त्यास बोलाउन फजीत बहूत केलें आनाजी रंगनाथ मलेकर मजमुदार त्याजपासोन पाती पो होन पाठविलें एक शेपंचवीस सवाशे होन आणून बहिरराव यांचे पदरी होन घालून सिंगोस डाग पागेचा करून पागेस लाविली. पागा पाहाता राजे श्लोक निरंतर म्हणत.

यस्याश्वास्तस्य राज्यं
यस्याश्वास्तस्य सौख्यं
यस्याश्वास्तस्य मेदिनी
यस्याश्वास्तस्य सामराज्यं

## कलम ७८

त्याउपर भागानगरास सिवाजीराजे गेले. पुढें मादणा व उमराब येऊन घेऊन गेले. दाद माहालावर भेटीस पातशाहचे खासा राजे व रघुनाथ नारायण व दत्ताजीपत वाकनवीस व बहिरराव सेनापती व प्रल्हाद निराजी वकील व अनाजी रंगनाथ मलेकर मजमुदार निसबत सेनापती व खिजमदगार- ... ... दाद महालाच्या सीडीवर पाय घ्यावा तो आनाजी रंगनाथ मलेकर यानी राजेसा-हेबास बिनती करून उभे केले. जे भले लोकास दोघे चौघे घेतले पाहिजे त्यावरून मानसिंग मोरे व रुपाजी भोसले दोघास हुकूम जाहाला. इतक्यानिशी दाद माहालावर गेले. तानशाहा पातशाहा माहालातून आले. इकडून राजे गेले. भेटी जाल्या. रघुनाथ नारायण व प्रल्हाद निराजी यास बसावयाची आज्ञा जाली. बरकड उभे होते. विड्याचा आग्रह बहूत पातशाहानी केला. परंतु विडा घेतला नाहीं. श्रीवाराणसीस जाऊन श्रीची स्थापना करू तेव्हां विडा घेऊं. विज्यापुरचे पातशाहा व तुम्ही लस्करचा खर्च देणें. दिल्ली पावेतो जाऊन यक राज्य करू. जे ऐसे

उत्तर पादशाहास दिले. तानशाहा पातशा ह्यानीं वस्त्रें उत्तम व हास्ती व घोडे पांच आरबी उत्तम, दाहा पालखी सुवर्णमय व पांच लक्ष होन ( दिलें ). साहा घटीकावर्ते होते. खालती फौज, लष्कर तमाम व मावले चाळीस हाजार पोषाक समस्तास उत्तम होते. घोडे व हत्ती श्रृंगारून ... ... ... ... ... देउन खालते उतरले. याउपर ... ... जाहले.

### कलम ७९

त्याउपर भागानगरी मुकाम महिनाभर होता. मादणाचे घरी कुल विप्र समुदाय व राजे सरदार दरोबस्त भोजन स्वइच्छा पाच मेहमान्या सर्वांस तीस जाल्या. श्रीकेशव स्वामीची कथा नित्य रोज ऐकत आसत. जाते समई पांच लक्ष होन जवाहीर पन्नास हजारेचे दिलें. त्याउपर भागानगरीहून स्वार जालें.

### कलम ८०

त्याउपर कनोल तुंगभद्रातीर तेथें पाच लक्ष होन घेतले. आनंदराव कनोजकर देशमुख येऊन भेटले. त्याउपर निवृत्ती सगमावरून श्रीसैल्यास गेले. अनंतपुरीवर लष्कर ठेवून तेथून गायमुखापासोन पर्वत बेंधावा व भीमकुड उत्तरेचा मिळोन तीन कोस साडे तीन गांवे कुल पर्वत चढ आहे. दो दिवसी श्रीशैल्यास राजे गेले. त्यास्थळी नऊ दिवस होते. जाताच वैराग्य प्राप्त झाले. विभूती चर्चून सहस्त्र रुद्राक्ष धारण केले. शास्त्रांतील पुराणातील वचने रघुनाथ नारायण याणीं सागोन नव दिवसी सावध जाले. नील गंगेस संध्यामठ चिरेबंदी बाधविला. धर्म बहूत केला. ब्रह्मणभोजन यात्रा साग समस्त लष्करास जाली. लक्ष ब्राह्मणाचा सकल्प करविला. त्याउपर मजल दरमजल चंदीगातास गेले.

### कलम ८१

त्याउपर जातांच वेरुळास वेढा घातला. खालीं डोंगर समीप दोन होते. किले बांधले. त्याचे नाव साजिरे व गोजिरे नावें ठेविली. त्याउपरी तोफा ठेऊन किला जेर केला नरहरी रुद्र नावबद [ ? ] ठेविले. पाच हजार मावळे व दोन हाजार फौज ठेऊन पलीकडे चंदीस गेले. चदीस मुकाम चक्रापुरी चक्रवती नदीचे काठी केला चंदीस किलेदार आंबरखान त्याचे पुत्र आठ जण होते.

५३३५

त्यास सांगोन पाठविले जे विजापूर भागानगरचा पातशाहाचा आहे. तुम्ही भेटीस येणें. त्यावरून अंबरखान पुत्रास देखील लस्करात बेवसवसा आला येतांच राजे साहेबी कैद केला. चंदी घेतली. रायाजी नलगे हवालदार ठेविले. तिमाजी केशव सबनवीस ठेविले. इमारतीवर रुद्राजी सालवी ठेविले विठल पिलदेव आत्रे गराडगर सुभेदार माहालचे याप्रमाणें ठेविले. चंदी घेतली.

## कलम ८२

त्या उपर चंदीपलीकडे लस्कर मुकाम मौजे आरदर नजीक त्रिवादी तेथें राहून येकाजी राजे त्यास पत्र पाठविले, जे माहाराज साहेब माघले जन्मापासून नाहीं. भेटीचा हेतु घरुन तुम्हाकडे आलो. तुम्ही भेटीस येणें त्यावरून येकोजी राजे व जगन्नाथपंत दिवाण फौजेसहवर्तमान येऊन श्री सिवाई विधीयुक्त भेटी जाल्या. धर्म बहोत केला. त्यावर भोजने उभयता एक ताटी जाले. नित्य एक ताटी भोजने करून एकांती वाद होउ लागला. सन्निध रघुनाथ नारायण व दत्तोजी पंत वाकनीवीस व बाल परभू चिटणवीस व बहिरराव सेनापती व अन्नाजी रंगनाथ मलेकर मजुमदार वाद समई आसेत. चंदावरचें राज्य बाप रोटी निमे तुम्ही घेणें निमे आम्हास देणें. असे सिवाजी राजे म्हणो लागले येकोजी राजे त्याणी उत्तर दिधले जे देशी मिलविले त्यातील निमे आम्हास देणें देसी कांहीं वडिली मिलविलें नाहीं. असे सिवाजी राजे म्हणत असता भांडण शब्दाचे पंधरा दिवस होते. सरशेवटीं निदानी येकोजी राजे म्हणो लागले जे धार दिव्य तुम्ही आम्ही युद्ध करू. आम्ही फौज जमा करून येतो. तुम्हीही तयार असणें असे बोलोन रुसून चालिले ... सिवाजी राजे पाई समाधान करीत डेऱ्याबाहेर आले. परतु ऐकिलें नाहीं घोडीवर स्वार होऊन चंदावरास चालिले त्यास बोलवीत बहिरराव सेनापती व मानाजी मोरे व रुपाजी भोसले व आनाजी रंगनाथ मलेकर असे राजे साहेबी समागमे देऊन चंदावर पावेतो दिधले. चंदावर पावेतो गेले. त्याचा बहुमान वस्त्रें देऊन माघारे वटे लाविले

## कलम ८३

त्याउपर सिवाजी राजे यानी रघुनाथपंत व सेनापती कुल फौज ठेऊन देशास राजे स्वार देउन गेले. मग समागमे दत्ताजीपंत व बालपरभू चिटणीस व मानाजी मोरे व अनदराव पंचहजरी घेऊन पन्हालीयास दाखल जाले. मागे युद्ध येकाजी

राजे त्याची फौज जगन्नाथपंत दिवाण व भीवजी व रायभानजी राजे तमाम सरदार वीस हजार फौज व बरखंदाज पन्नास हजार असे चालोन आले. पंधरा दिवस युद्ध जालें बाहीर बुणगे चंदीचे आशरीयानें ठेऊन सडेभोवताले चार फौजा करून युद्ध नित्य पंधरा दिवस होतां, एक दिवस चोहीकडून घोडी घातली. प्यादे दोन हजार मरिले तेच समई मोड जाला. जगन्नाथपंत व भिवजी राजे रायभानजी राजे तमाम वजीर पाडाव जाले. प्यादे पल्होन गेले चंदावरची फौज बुडाविली हजार सीपाई, ब्राम्हण व मराठे मिलोन पडिले. रघुनाथपंताकडील पाचशे बारगीर खस्त जाले. मेले. फत्ते जाली. त्याउपर सलुखा जाला. निम्मे राज्य कोवारी ( कावेरी ) उत्तरतीर काले तहद, बालापूर व कोल्हापूर व माहाराजगड व जगदेवगड व कर्नाटकगड व तमाम वाटणी घेतली. किले घेतले. कडाभरणी किल्ला वेदाजी भास्कर याचे पुत्र आठजण सुभाराव व श्रीनिवासराव वगैरे त्या खालेतीन लक्षाचा मुलुक किले चेणीदुर्ग देखिल इनाम राजश्री राजे स्वामीनी दिधला. माहाराज शाहाजीराजे त्यापासून इनाम असे. त्याचे वाटे कोणी गेले नाही वेरुळचा किल्ला तोही फते जाला त्याप्रातीं रघुनाथ नारायण चंदीस येऊन देशास बहिरराव सेनापती कुल फौज घेऊन चालिले. कर्नाटक पन्नास लक्ष होनाचा मुलुक राज्य घेतले होते.

## कलम ८४

त्याउपर विजयापूरचे पातशाहानीं फौज बहिरराव सेनापती याजवर वाटेस आडवी फौज प्रथम हुसेनखान मायणा दहा हजार फौजे निसी युद्धास आला. चंदावरून घेतले म्हणोन आले. युद्ध बहुत जाले. हुसेनखान मायणा पाडाव केला. फौज कुल बुडाविली सवेच त्या मागे लाधीखान सरदार होता त्यासही बुडविले. दोनहि सरदार पाडाव जाले. रायगडास उभयतास घेऊन गेले

## कलम ८५

त्याउपर तेच समई कापले व बाहादरबिंडा किला घेतला. बहिरराव त्या समागमें संताजी घोरपडे व बहीरजी घोरपडे याणी तरवार केली. म्हणोन नवसील विशेष तैनाती केली म्हणोन राजे इतराज जाले. ते समई येकोजी खांडेकर त्यापासी धनाजी जाधव होते. ते समई तरवार केली म्हणोन नवाजीनें जुमला त्यास सांगितले. त्याची भजमु भानाजी तुकदेव होते.

## कलम ८६

त्याउपर रायगडास बहिरराव मोहिते सेनापती व अनाजी रंगनाथ मलेकर मुजुमदार याजवर मेहेरवान जाले. बकसीस दिधली होती. फत्ते करून आले तें समई दिल्ही.

## कलम ८७

त्याउपर वेदमूर्ती गंगाभट वाराणसीकर येउन रायगडी मुंजी बंधन पट्टाभिषेक सिंहासनारूढ जाले. पती जाले शके १५९६ आनंदनाम सवत्सरे. चैत्र शु॥. १ तें दिवसी छत्रपती जाले.

## कलम ८८

त्याउपर फौज कुल घेउन कसबे जानहापुर मारिलें. फकीर वली होता. त्यास कष्टी केलें, द्रव्य घेतलें. तें समई रणमस्तखान धावून आला. युद्ध जाले. सिदोजी निंबालकर पंचहजारी त्यास गोळा लागोन पडताच राजे रातोरात किलेपठियास फौजेसहवर्तमान आले. गडाचे नाम किले विश्रामगड नाम ठेविले. मानाजी मोरे व संताजी घोरपडे याजवर इतराज जाले. युद्ध समई उतावली केली म्हणून मजुरीयासी येउ दिल्हे नाहींत

## कलम ८९

त्याजउपर किले रायगडास राजे गेले. दसरा होताच कुल फौजा सरदार मुलुकगिरीस रवाना केल्या ते उपर राजे स्वामीस व्यथा नवज्वर जाला. शके १६०२ रौद्रनाम सवत्सरे चैत्री पौर्णीमा दोन प्रहरा राजे स्वामी कैलासवासी जाले. अंतकाली बहूत धर्म केला. सहस्र रुद्राक्ष परिधान, भागीरथी उदके स्नान, विभूतीचें चर्चन केलें सावधपणें सिवस्मरणे करून देह ठेविला. हरदास कीर्तन. अतकाल समई मोरोपंत पेशवे व आनाजी दत्तो सुरनीवीस व बाल परभू चिटणवीस होते. तहपत्रें देऊन सावधपणें देह ठेविला.

## कलम ९०

त्या उपर समीप राजाराम होते संभाजी राजे किले पन्हाला होते. मोरोपंत पेशवे व अनाजी दत्तो सुरनवीस याउपर इतराज जाले. किले पन्हाला कुल सरदार जाऊन भेटले. त्यापुढें वर्तमान सर्वांस विदीत प्रसिद्ध आहे.

कलम ९१

सदरहू आख्यान संकलित नव्वद प्रकरण पुण्यश्लोक राजा त्याची कथा वर्तली ती लिहीली आसे.

कलम ९२

हस्ताक्षर खंडो आनाजी मळेकर यांचे वडिलो संग्रह केला होता. रायगड दप्तरीं संग्रह वंशावली होती. त्याची तालीक वडिलापासी होती. संकलीत लेहून ठेविली होती.

( परिशिष्ट )

राजेश्री सिवाजी राजे त्याचा जन्मकाल शके १५४९ क्षयनाम संवत्सरे वैशाख शु॥ २ गुरुवार आयुष्य वर्षें ५३. शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे चैत्र पौर्णिमेस शांत झाले. मुकाम रायगड. बालत्व १७ वर्षे. राज्य केले ३६ वर्षे. एकूण ५३.

राज्य आरंभापासोन ता॥ सुमारे वर्षें झाली.

| | |
|---|---|
| सासे शिवाजी राजे थोरले | ३६ |
| संभाजी राजे | ७ |
| राजेश्री राजाराम | १३ |
| मातोश्री ताराबाई व राजेश्री शिवाजी राजे | ८ |
| रा॥ राजा शाहू ता॥ शके १६६१ सिद्धार्थी नाम संवत्सेर | ३२ |
| | ९६ |
| धाकुटपण बालत्व थोरले शिवाजी राजे कारकीर्द दादोजी कोंडदेव. | १७ |
| | ११३ |

---

यादी किले दौलताबादेस रामदेवराव हेमाडपंत राज्यकारभार करीत होते. त्यास वर्षें शके १२५५ मन्मथ नाम संवत्सरे सु॥ वर्षें शके १६६१ सिद्धार्थी नाम संवत्सरे. वर्षें झाली ४०६.

---

यादी किले चंदी घेतली. राजेश्री यंकोजी राजे त्याची भेट झाली. किले वेरोळ को॰ घेतला. त्या स्थळीं शके १५९५ प्रमादी नाम संवत्सरें चैत्र बहुल त्रयोदशी भौमवा॰ ते दिवशी अंगास राजे स्वामी यांचे आली. पाच घटिका अगांत होती. वाक्य भविष्य सागितलें. श्रीचें वाक्य तपसील संक्षेप.

१ देशीचे राज्य ताम्र घेतील. रायगड जाईल. राजे संभाजी राजे सांपडतील, राज्य जाईल.

२ राजेश्री राजाराम राज्य करील. चंदीचे राज्याकडून मागती राज्य देशीचे प्राप्त होईल,

३ पुढें राजा सिव भागती अवतार राज्य दिल्ली पावेतों घेतील. एक राज्य होईल.

४ पुढें २७ पिढ्या भोसले यांचे राज्य असे.

५ पूर्वी पूर्वजन्मी सिवाजी राजे याणी सत्तावीस कावडी भागीर्थी उदक श्री रामेश्वरास नेऊन घातलें. २७ जन्मे श्री भवानीस श्रीकमळें वाहिली.

६ याजबद्दल २७ पिढ्या राज्य भोसले याचे असे. त्या उपर २७ वा राजा गर्भांध होईल. तो राज्य बुडवील.

सदरहू भविष्य राजीयाचे श्री भवानी वाक्य कथन केले. प्रश्न रघुनाथ नारायण हनुमंते त्याणी केला. दत्ताजीपंत वाकनवीस व बाळ परभू चिटनवीस त्याणी वाक्य लेहून ठेविले होते. फर्द सुमारे २४ होते. रायगडी कागद लिहिले होते त्याची सक्षेप यादी आनाजी रंगनाथ मलेकर यापासी होती. त्याची तालीक लिहिली असे.

---

यादी सेनापती व मुजुमदार झाले ई॥ राज्य त॥ राज्य हाली शाहूराजा सु॥र तपसील शके १६६१ सिद्धार्थीनाम संवत्सरे.

**सेनापति अ॥ सु॥ व॥**

१ . . दाबतोंडे. सरनोबत हुकूम मानीनासे झाले. मुऱ्हारज गडेनजीक सीवापट्टण तेथें चौरंग करून मारिले.

**मजमूदार निमे सेनापती अ॥**

१ प्रथम वेणु मुकुंद दाबतोंडे व पालकर.

| | |
|---|---|
| १ नेताजी पालकर. मोगलाईत गेले. स्थान भ्रष्ट झाले व जातिभ्रष्ट झाले. | १ कान्हो मोरदेव गुपचुप पालकर व गुजर. |
| १ प्रतापराव गुजर रणमस्तखानाचे लढाईत पडला. | १ अनाजी रंगनाथ मलेकर, बहिरराव मोहिते. कारकीर्द सिवाजी राजे. |
| १ बहिरराव मोहिते बाईस गोळा लागून पडले. कारकीर्द संभाजी राजे. | १ गोविंद गंभीरराव व बहिरराव मोहिते त॥ संभाजी राजे |
| १ माहादाजी नाईक पानसंबल कारकीर्द राजाराम मु॥ चंदी कर्नाटक प्रांत. | १ महादाजी तुकदेव, बहिरराव मोहिते. कारकीर्द संभाजी राजे. गरबड झाली. ते समई. |
| १ संभाजी घोरपडे कारकीर्द राजाराम स्वामी द्रोह केला. राधाई मानीने नि॥...मारिलें. | १ अनाजी रंगनाथ मलेकर कारकीर्द राजाराम मु॥ चंदी, माहादाजी नाईक यास बलभागती मजमु झाली. निलो बल्लाल परभू चिटनवीस जमीन नि॥. |
| १ जोसिंग जाधवराव त॥ राजा शाहू वडगांव जि॥ पन्हाला. गंडमाळा व्यथेनें मेले. | १ कान्हो मोरदेव गपचूप मागती मु॥ चंदी नि॥ संताजी घोरपडे. |
| १ चंद्रसेन जाधवराव, पुत्र जाधवराव त्याचे मागें लढाईत गेले. स्थानभ्रष्ट झाले. | १ गोपाळ अनंत ठकार कारकीर्द राजाराम धनाजी जाधवराव सेनापती. |
| १ संताजी जाधवराव त्याचे पुत्र धनाजी जाधवराव. | १ भवानी त्रिंबक नि॥ जाधवराव कारकीर्द राजाराम ताराबाई. |
| १ मानसिंग मोरे. | १ कल्याण सिवदेव नि॥ संताजी जाधवराव. |
| १ खंडेराव दाभाडे. | शामराव आबाजी नि॥ मानसिंग मोरे. |
| १ त्रिंबकराव दाभाडे तांब्राचे...राजेश्री | १ भास्कर बल्लाळ सेणवे नि॥ |

| | |
|---|---|
| बाजीराव बल्लाळ मुख्य प्रधान त्याणी युद्धी मारिले. प्र॥ गुजराथ. | [illegible]डे दाभाडे. |
| १ यशवंतराव दाभाडे हल्लीं आहेत. | १ हल्ली धनी [illegible] यशवंत-दाभाडे. |
| १३ | १३ |

सदरहू सेनापती व मुजमुदार झाले. जमीनीविसी जी पुरातन बाबाजी बाजी परभू त्याची देशकुलकर्णी हिरडस मावल त्याचे पुत्र हल्ली खंडो बाबाजी परभू जमिनीसी करतात. हल्ली आसेत.

## शिवशकावली

### १६०९—१६६८

१६०९ राजाराम चंदीस गेले सेनापती महादजी नि॥ पानसंबळ [ शिव शके १४. सन १०९७ ]

१६११ चंदीस वेढा बसला. [ शि. श. १६ स. १०९९ ]

१६२१ पातशाहानी सातारा घेतला राजाराम सिंहगडी मृत्यु पावले. [ शि. श. १६ स. ११०९ ]

१६२८ औरंगशाहा नगरी मृत्यु पावले [ शि. श. ३३ स. १११६ ]

१६२९ आजमदशाहा युद्धी मृत्यु पावला [ शि. श. ३४ स १११७ ]

१६३० बाहादुरशाहा येऊन कामाण्णास भागानगरी मारिले. राजा शाहू दक्षिणेस येऊन राज्यारूढ झाले. ( सर्वजित् सं ). [ शि. श. ३५ स. १११८ ]

१६३६ हैबतराव निंबाळकर सरलस्कर वायपट (?) प्रांतीच मृत्यु झाला. [ शि. श ४१ स. ११२४ ]

१६३९ सिंहस्थसाली बाळाजीपंत दिल्लीहून आले. तांम्रासी सख्य केले. [ शि. श. ४४ स. ११२७ ]

१६४९ संभाजीराजे निजाम. नजीक पैठणी बाजीरावाची फत्ते झाली [ शि. श. ५४ स. ११३७ ]

१६५६ सिंहासनारूढ रायगडी थोरले राजे जाले. चैत्र शु॥ १ आनंदसं

१६६० स्वारी राजेश्री बाजीराव मुख्य प्रधान दुर्योधन ताम्र पराभव प्रांत माळवे भुपालगड [ शि श. ६५ स. ११४८ ]
१६६५ विजापुरांत शाई तांम्रानीं घेतली.
१६६८ संभाजी राजे तुळापुरी मृत्यु पावले साठ वर्षे झाली.

धर्मराजाचे घराण्याचे पुरुष आठ झाले. निमे चक्र राजाचे कारकीर्दीत हस्तनापुरीच वस्ती होती. पुढें नववा पुरुष राजा चित्ररथ याचे कारकिर्दीस हास्तनापुरी श्रीगंगा येऊन बुडविलें. सबब इंद्रप्रस्थ ऊर्फ दिल्लीस येऊन राज्य करू लागले पुढील युधिष्ठिराचे घराण्याचे आठ पुरुष झाले मु॥ वर्षे ५८२ मास ९ दिवस १४. याजपुढें इंद्रप्रस्थी राज्य करू लागले चित्ररथापासोन.

## शकावली

## शिवजन्मापासून इंग्रजानीं पुण्यावर झेंडा रोवी पर्यंत

## शाके १५४८--१७३९

| | | |
|---|---|---|
| १५४८ | क्षय. स | किले सिवनेरी येथें सिवाजी राजे यांचा जन्म झाला. |
| १५९६ | आनद. | सिवाजी राजे यास राज्याभिषेक झाला. |
| १६२९ | सर्वजित् | दिल्लीहून शाहू माहाराज राज्यावर पौष मासी आले. संकराजी नारायण सचीव कैलासवासी झाले. पुढे मुतालिक पंताजी सिवदेव ( साल ३४ ) |
| १६३० | सर्वधारी | मोरो शंकर सचीव १६ महिन्याचें वय होते. |
| १६३३ | खर | दाखला इनामगावचा राजपत्र पंताजी सिवदेव राजाआज्ञा याचे नावें. कारकीर्दे मोरोपंत पिंगळे प्रधान रुजु बहिरो मोरेश्वर. राज्यास साल ३८. |
| १६३५ | विजय | दाखला राजपत्र मोरोपत पेशवे रुजु बहिरोपंत ता॥ राज्यास साल ४०. |
| १६३९ | हेमलंबी | दाखला इनामगांवचा राजपत्र पंताजी सिवदेव याचे नावें. कारकीर्द बाळाजी विश्वनाथ प्रधान. |
| १६५१ | सौम्य | कार्तिक व॥ १२ पंताजी सिवदेव राजाआज्ञा व खासगी कैलासवासी झाले ता॥ साल राज्यास ५६. |
| १६७१ | शुक्र | मार्गशीर्ष शु॥ १३ बारसी पालगावीहून सोमवारी राजाराम कृष्णातीरी माहुली सगमी आले. तेथें श्रीमंत |

बाळाजी बाजीराव पंत प्रधान पुढे पौष शु॥ ८ सप्तमीस आले. दशमीस राज्यासनी बैसले. नक्षत्र २१ घटी ५१ योग १२ घटी ४१.

क्षिति नगनृपशाके ( १६७१ ) मार्ग कृष्ण तृतीया
भृगुगुरुयुतेन्हि प्राट्ले शुक्ल वर्षे ।
निखिलभुवननाथो भार्यया शाहुवर्मा
दिणमणि दिवचास्तं देवलोकं जगाम ॥

शाके भूऋषिशास्त्रभूपरिमिते ( १६७१ ) शुक्लद्वये विश्वभे
मार्गे शुक्लतृतियिका भृगुयुते योगे ध्रुवाख्ये शुभे ।
श्रीमत्सपर्शषिस्थले नृपवरः श्रीशाहु सञ्ज्ञो नृप·
पंचत्वं समवाप दक्षिणदिशा·पालः प्रतापी महान् ॥

१६८१ प्रमादी श्रीभाऊसाहेब व विश्वासराव हिंदुस्थानचे स्वारीस गेले गंगातीरास जाता नबाब निजामअली याणी युद्ध होऊन सा लक्षाची जाहागीर व नगरचा किल्ला दौलताबादचे किल्ले घेऊन पुढें स्वार होऊन गेले.

१६८५ सुभानु राज्य शक सालमजकुरी वैशाखमासी नबाब निजाम अली खाँ पुण्यास येऊन शहरची तसलस केली. प्रांतात दंगा झाला. सिंहगड लोहगडची पेठ लुटली गेली. कारकीर्द श्रीमंत माधवराव बल्लाळ प्रधान. नबाबाचे राज्यांत जाऊन दंगा करून शक मजकुरी जात. आषाढमासी स्वारी राक्षसभुवनावर गंगातीरास येऊन नबाब निजाम अलीची लढाई मातबर होऊन नबाबाची बहुत खराबी होऊन सरदार त्याचे फार लढाईत पडून मोड करून नबाब भागानगरास गेले. श्रीमंत स्वारी पुण्यास आली.

१६९४ नंदन श्रीमंत माधवराव बल्लाल प्रधान गणपती थेऊरचे मुकामी कैलासवासी जाले. नंतर शके १६९५ विजय. श्रीमंत नारायणराव बल्लाळ प्रधान भाद्रपद शु ॥ १४ कैलासवासी जाले. नंतर श्रीमंत रघुनाथ बाजीराव.

| | | |
|---|---|---|
| १६९६ | विजय | वैशाख शु॥ ७ इंदुवासर पुनर्वसु नक्षत्र किल्ले पुरंदर येथें जन्म श्रीमंत माधवराव नारायण प्रधान. |
| १७१४ | परिधावी | एक वर्ष धारण ८८१ जाली. प्रांत वोस. प्रजा गेली. मेली. |
| १७१६ | आनंद | हरीपंत तात्या फडके कैलासवासी झाले. व शक मजकुरीं मार्गशीर्षमासी डेरे दाखल सवाई माधवराव होऊन स्वारी मोगलावर खर्डे ग्राजवर लढाई झाली. नवाब सिकस्त करून स्वारी श्रीमंताची वैशाख मासी शके १७१७ त पुण्यास आली |
| १७१७ | राक्षस | आश्विन शु॥ १५ श्रीमंत माधवराव कैलासवासी झाले. नंतर शकमजकुरी माघ शुक्रपक्षी श्रीमंत बाजीराव साहेब. |
| १७२१ | सिद्धार्थी | फाल्गुन व॥३ नाना फडणवीस कैलासवासी झाले. |
| १७२४ | दुंदुभि | आश्विन व॥ १४ होलकराची लढाई. पुणें घेतलें. पुण्याची तसनस बहुत केली. |
| १७२६ | रक्ताक्षी | प्रांत पुणें येथें पर्जन्यकाळीं चार मास शेर धारण होऊन प्रांत उध्वस्त जाला. कोकणांत ६ शेर धारण जाली होती. मोठा प्रळय होऊन प्रजा गेली. मेली. गंगातीर वगैरे वोस पडले. |
| १७३७ | धाता | आषाढ गंगाधरशास्त्री पंढरपुरी इंग्रजाकडून मारले गेले. |
| १७३९ | ईश्वर | आश्विन व॥ ११ इंग्रजाची लढाई झाली. दुसरी लढाई कार्तिक शु॥ ८ रविवार सायंकाळी शक मजकुरी लढाई प्रारंभ तेच दिवसी मध्यरात्रीस श्रीमंत बाबा-साहेब पळोन माऊलीकडे गेले. दुसरे दिवशी प्रातःकाल होताच पावेतो बापु गोखले वगैरे पळोन गेले. तेच दिवशी शु॥ ९...इंग्रजांनीं झेंडा पुण्यात...... |

# १२ कलमी बखरींतील नांवाची सूचि

( आकडे कलमाचे आहेत )

## हिंदु नांवें.


अनाजी दत्तो ४१,५१,७६,८९,९०
अनाजी रंगनाथ मलेकर ३२,६२,७१, ७७, ७८, ८२, ८६
आऊजी गोविंद हणमंते ९
आकूजी घोरपडे ६९
आण्णा गोमाजी पानसंबल ९
आनंदराव ५५
आनंदराव कलोलकर ८०
आनंदराव पंचहजारी ८३
उदाराम देशमुख २६
उमाजी ( राजे ) २१
उमाजीपंत ५९
उमा पंडित ६५
कान्हो मोरदेव गुपचुप ३६,७१
कृष्णराव मोरे २९, ३०
कृष्णाजी भास्कर ३१,३३,३४,
केसो त्रिमल ६२
केशव स्वामी ७९
खेलाजी २
खंडो अनाजी ९२
खंडोजी खोपडा ३२, ३५
गंगाभट वाराणसीकर ८७
चंदाराव मोरे २९
जगन्नाथपत ८२,८३
जगपाळ निंबाळकर ६,७
जनार्दनपंत ७५
जीवमाहाला ३३,३४
जैसिंग (पहा. मिरजा राजा)
तिमाजी केशव ८१
तुकोजी २२
तेलंगराव ५५
त्रिंबकपंत डबीर ५१,५३,५४,५७
त्रिंबक सोनदेव ४१
दत्ताजी गोपीनाथ ३१,३२,३४,३५, ४१
दत्ताजी वाकनीस ७८,८२,८३
दत्ताजी हेजीब ३३
दादो धोंडदेव ( कोंडदेव ) २०,२१, २४,२७,२९
धनाजी जाधव ८५
नानाजी विश्वासराव ५६
नारो त्रिंबक पिंगळे २९
निलो सोनदेव ४१,५१,७५

निराजी रावजी ५१,५२,५३,५४,५५
६२,७४
निळोजी नीळकंठ २७,२८
नेताजी पालकर ३६,३८,४३
पिलाजी नीलकंठ २८
पंताजी गोपीनाथ ३३
प्रतापराव गुजर ४१, ४९, ५१, ५३,
५७, ६२, ७१
प्रल्हाद निराजी ७४, ७८
फिरंगोजी नरसाळा ४३, ५९
बयाजी फर्जंद ७१
बहिरजी घोरपडे ८५
बहिरराव मोहिते ७१, ७७, ७८,
८२, ८३, ८४, ८६
बाजी घोरपडे ६६, ६७, ६८, ६९,
७०
बाजी परभू ३९
बाजीराव मोरे २९, ३०
बाबाजी बाजी ४०, ७१
बाबाजीराम होनप ४३
बाळप्रभू चिटनवीस ८२, ८३, ८९
बिदनूरकर ६४, ६५,
भानाजी तुकदेव ८५
भावसिंग ६२
भीवजी ८३
मदनाथपंत ७४
मंबाजी २
मादणा ६०, ७४, ७९
मानसिंग मोरे ७८, ८२, ८३, ८८
मालोजी. १, ३, ४, ५, ८, ९, १०
मिरजा राजा (जैसिंग) ४३, ४८,
४९, ५०, ५१, ५८, ६२
मुरार जगदेव १४ १६, १८, १९
२०, २१
मोरो तानदेव २०, २१
मोरोपंत पिंगळे ४०, ५१, ६२, ७६,
८९, ९०
मोहोकम सिंग ४१, ४३
येकोजी २२, ६६, ७५, ८६,८२, ८३
~~येकोजी खांडेकर~~ ८५
येसाजी मल्हार ६२
रंगनाथ भट १०
रघुनाथ नारायण ७०,७५,७६,७८
८०,८२,८३
रघुनाथपंत कोरडे ५१,५४,५७,८३
रघुनाथ बल्लाळ २४,२९
राघो बल्लाळ अत्रे २४
राजकर्ण ६२
राजाराम ५१,६४,७६,९०
रामजी नाइक पुंडे ७३
रामसिंग ५२,५३
रायभानजी ८३
रायराव २०
रायाजी नलगे ८१

रुद्राजी सालवी ८१
रुपाजी भोंसले ७८,८२
लखुजी जाधव १–४,६–९,१२–१६
लाडतोजी गुजर ३८
विजय राघव २२
विठोजी भोसले १–६,८,९
विठ्ठल पीलदेव ८१
विठ्ठल भालेराव ५९
वेदाजी भास्कर ८३
शरफाजी २,२२
शामराव नीळकंठ २४,२५,४०
शाहाजी २,३,४,७,८,११,१३–१६,
१८–२२,२४,२७,३१,
३६–६८,७०,७२,७५,८३
शिवाजी १५,२०,२१,२४,२५,२७
२८.३१,३२,३४,३६–३९
४१,४३,४६,४८-५०,५२
५३,५५,५८,६३,६६,६७,
६९,७५,७८,८२,८३,८९
शेषाप्पा नाईक ६
श्रीनिवासराव ८३
संकराजी नीलकंठ २८
संताजी घोरपडे ८५,८८
संभाजी ११,१४,२१,५०,५२,५६,
५९–६१,७६,९०
संभाजी काउजी ३३,३४,४३
साबाजी अनंत ११,१७,२३
सिदोजी निंबालकर ८८
सिव्या नाइक ६४,६५
सुभाराव ८३
सोन माहाला ३३
हणमंतराव मोरे २९
हिरोजी फर्जंद ३३,५१,५३,५४,५७

## मुसलमानी नांवें

आबदुलाखान ३१,३२,३५,३७,६६
औरंगजेब ( औरंगशा ) २३,२५,२६,
४१,४३
तानशाहा ७४,७८
दाराशाहा २६
दिलेरखान ५०,५८–६१
निजामशहा १,७,२०,६३
फाजीलखान ३३,३७,३९
बरारब हपसी २०
बहिर निजामशाहा ११
मलिकंबर हपसी १७,१८,२१,२३
मीर जुमला १२,१६,१७, २३
मुरादबकस २६
रणदुल्लाखान १८,१९,६७,६८, ७२
रणमस्तखान ७१,८८
रहीमखान ५२

रोहिलाखान ५४
लाधीखान ८४
शास्तखान ४३,४४,४६,४८
शाहा आलम ६२
शाहा जादा २३,२५,३२
शाहा शुजा २६
सरज्या खान १८,१९,२१,२३,३९
६७,७२
सिकंदर १६,२१
हिलाल हपसी २८
हुसेनखान मायणा ८४

## स्त्रियांची नांवें

जिजावा २–४,७–९,११,१४,१५,
२०,२१,२८,३१,३२,३५,
५१,५५,५६,७०
तुकाई ( तुकाबाई ) २१,२२
दीपाबाई २२
फुलाई आव्वा २०
मकुबाई जिंतीकर २१
रायबागीण २६

# नद्या, ओढे, किल्ले, गड, घाट, देश, प्रांत व गावें

## यांची सूचि

( आंकडे कलमाचे आहेत )

### नद्या व ओढे

आंबिलावल ( ४६ ). इंद्रायणी ( १९ ). कावेरी ( ८३ ). कोयना ( ३२ ). गंगा ( ७,५५ ). चक्रवती ( ८१ ). तुंगभद्रा ( ७२,८० ). नर्मदा ( १२,१६, १७ ). नीलगंगा ( ८० ). भीमा ( १८,१९,५५,५८ ).

### किल्ले, गड व घाट.

कडाआरणि (८३). कर्णाटक गड (८३). कापले किल्ला (८४) कुलगड (३६) कोंडाणा ( ४९ ). गोजिरे कि ( ८१ ). चंदन वंदन ( ३६ ). चाकण ( १९, २०,२९,४३,७१ ). जगदेव गड ( ८३ ). तोरणा ( २९ ) देवगड ( ५५ ) नरहरीरुद्र ( ८१ ). निंबे ढेव्हारे ( ७ ). निशानी घाट ( २९ ). पन्हाला ( ३६,३७,५९,६०,६९,७५,८३,९० ). पद्मावती ( २९ ). पारगड ( ३६ ). पावनगड ( ३८ ) पुरंदर ( २७,२९,४०,५०.६२,७१ ). प्रतापगड ( २९, ३१,३२ ), प्रचंडगड ( २९ ). बहादूरबिंडा ( ८४ ). भिवगड ( ३६ ). भुलेश्वरगड ( २० ). भूपालगड ( ४३,५९ ). महाराजगड ( २२,८१ ) माहुली ( १३,१४,१७,६२ ). रडतोंडी घाट (२९, ३२,३५ ). राजगड ( २९,४०, ४२,४६,४९,६० ). रायगड ( २९,४७,४९,५१,५६,६२,६४,७१,७५,८४, ८६,८७,८९ ). विजयदुर्ग ( ४१ ). विशालगड ( ३६,३९ ) विश्रामगड ( ८८ ) शिवनेरी ( १५,२० ). साजिरे ( ८१ ). सालेर ( ६२ ). सिंधुदुर्ग ( ४२,६४,६५ ). सिंहगड ( २९,४९,५० ). सुवर्णदुर्ग ( ४२ ). सवेळा ( २९ ).

इति १०९
433 (६६)

# देश प्रांत व गांवें

आरदर (८२) आलापुर (२३) आवंडप्रांत (६२) आशेर (१७) इंदापूर (२०) इंदूर (५५) उत्तरमानस (५५) औरंगाबाद (२३,५१,६२) कडवली (५५) कनकगिरी (७७) कनोल (८०) कर्णाटक प्रांत (१६,२२,३१,६६,६८,७०,७६,८३) कलगिरी (२१) कल्याण (१३. ४२) काशी (३२,५६) कुलाबा प्रांत (४२) कोरेगाव (१८) कोल्हापुर (२२,६८,७१,८३) खानदेश (२३) खेडबरें (२१) गया (३२,५५) गुडगी (२३) गोकर्ण (६५) गोणीमठ (४१) गोवें (४२) घारापूर (५९) घृष्णेश्वर (१०) चक्रापुर (८१) चांपे प्रांत (५५) चंदी (६६,८१–८४) चंदीप्रांत (८०) चंदावर (२२,२४,६६,६८,७५,७६,८२) जान्हापूर (८८) जावळी (२९) जुन्नर (२०) जेजुरी (७०) जोवर (२९) तळकोंकण (४२) तळेगांव (१८) तुळजापुर (३१,३५) तुळापुर (१९) त्रिंबक (६२) त्रिवादी (६६,८२) दिल्ली (१२,१४,१७,२३,२५,२६,४१,४८,५०,५१,५४,५५,५७,६३) दौलताबाद (१,७,८,९,१२,१७,१८,२३,६३, ७३) नगर (२,४१) नाइकवाडी (२७,२८) नारणगाव (१९) नारायण पेठ (५०) निवृत्ती (७०) पाचीगाव (६८) पारगांव (३२) पुणे (१९,२०,२४,२९,३०,४७,७०) पेडगाव (५०,५८) प्रयाग (५५) फलटण (७) बऱ्हाणपुर (१७,२३) बसवा पट्टण (७२) बागलाण (६२) बाळापुर (२२,६२,६८,८३) बांदे जोड (४२) बिदनूर (७२) बेरामावळ (२९) भागानगर [५९,६०,७४,७८,७९,८१) भिवंडी (१३,४२) भीमकुंड (८०) मक्का (६७) मदुरा (२२) मलकर (२०,४३) महादेव (१८,७०) महाबळेश्वर (२९) मालवण (६४) माहोर (२६) रहिमतपूर (६८) राजापूर(४२) वऱ्हाड (२३) वाई (२०,२९,१३,३२,३५) वाराणसी (५५,७८) विजापूर (१४,१६,१८,२०–२४,२९,३१,३७,३९,५९ ६६,६८,७३, ७८ ८१,८४) वेरूळ (१,४,९,८१,८३) शिरवल (२०) श्रीगोंदे (६,७) श्रीशैल्य (८०) सांडसखुर्द (१९) सातारा (३६) सासवड (३१) सिंदखेड (१,९,१६) सिवापूर (२१,७०) सुरत (६३) हुसनूर प्रांत (६५) हिवरें (३१,३५)

REFBK-0005339

WORKS BY

V M Kotasthane, B A, B Sc L C E, M I., struct. E (Lond)

( १ ) **Reinforced Cement Concrete Construction** **Rs 7-14-0 net**

*A very useful and practical book on the subject*

( २ ) **Quantity Surveying** (Estimating) **Rs. 5 net**

*Extremely useful for Engineers & Contractors*

By M M Kotasthane B A, LL B.

( १ ) **On Bail in Criminal Matters** **Rs. 2-0 net.**

*Very useful to Bench Bar Police and Public.*

( २ ) **Motor Vehicle Law of India** ( with Bombay Rules ). **Rs 3-12-0 net.**

*A book for the Bench, Bar, Police and Public.*

(३) **मोटरवाहन कायदा व कानुंचे गाईड** (मराठी प्रत) किं २॥ रु ट ह नि.

प्रत्येक मोटर मालक, ड्रायव्हर व पोलीसांनी अवश्य जवळ बाळगावें.

(४) **મોટર વાહન કાયદા અને કાનૂનનુ ગાઈડ १९३५** [ગુજરાતી પ્રત] કિં. ૨-૧૨.

દરેક મોટર માલિક, ડ્રાઈવરે, પોલીસે પાસે રાખવું.

(५) **शिवाजीची बखर** किं. १ रु. ट. ह. नि.

९२ कलमी संपूर्ण बखर

(६) **जनसेवा भाग १ ला** किं. ०-१२-०

यांत कलह-मीमांसा, मानससरोवर, अंबोडा द्वीप, शेतकऱ्याची झोपडी वगैरे विविध विषयावर सुंदर लेख आहेत.

(७) **मद्रास, रामेश्वर, धनुष्कोटी** किं. ०-४-०

वरील प्रवासाचें सुंदर उपयुक्त वर्णन.

वरील सर्व पुस्तकें ६५-६७ काळबादेवी, मुंबई येथें **एम् एम्. कोटस्थाने,** ॲडव्होकेट हायकोर्ट किंवा सर्व प्रसिद्ध बुकसेलरांकडे विकत मिळतील